व भगवद्‌भजनी आसक्त होत चालले. नामदेवांनी प्रपंचात लक्ष घालावे म्हणून त्यांची पत्नी खूप प्रयत्न करी. ती उद्वेगाने म्हणते – "तुमची आई तुम्हाला शिकविते ते तुम्ही ऐकत नाही. तुम्हाला लौकिकाची भीती व लाज वाटत नाही. लंगोटी लावून गोसावी झालास खरे, पण आमची उठाठेव कोण करणार ? माझी सासू तर भोळीभाबडी. त्यांनी पांढऱ्या स्फटिकासारख्या माझ्या पति-रायाला जन्म दिला." नामदेवाच्या विठ्ठलभक्तीला विरोध करणारे हे संपूर्ण कुटुंब त्यांच्या प्रभावाने विठ्ठलाच्या भक्तिप्रेमात पुढे रंगून गेले, हे नामदेवांनी स्वीकारलेल्या भक्तिमार्गाचे फार मोठे यश आहे.

नामदेवांच्या जीवनात अत्यंत महत्त्वाची घटना म्हणजे ज्ञानदेवादी भावंडांची घडलेली भेट. ही भेट शके १२१२ च्या कार्तिक महिन्यानंतर आळंदी येथे झाली असावी. या भेटीतून गुरुपदेश घेतल्यानेच आपल्या भक्तीला परिपूर्णता येईल हे नामदेवांना कळून चुकले आणि त्यानुसार त्यांनी आवंढ्या गावी विसोबा खेचर ह्या थोर पारमार्थिक अधिकारी पुरूषाचे दर्शन घेऊन गुरूबोध व निर्गुणानुभूती घेतली – श्रवणीं सांगितली मात । मस्तकी ठेवियेला हात ।। पदपिंड विवर्जित । केला नामा ।। या आत्मबोधानंतर सर्वांभूती साक्षात्कार होताच, नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।। अशा निश्चयाने नामदेव पंढरपुरास आले.

शके १२१२ नंतर ज्ञानेश्वरादी भावंडाबरोबर नामदेवांनी उत्तर भारतात तीर्थयात्रा केल्या. कऱ्हाड तऱ्हेगावच्या मार्गाने हा संतमेळा तापी नर्मदा तीरी आला. तेथून त्यांनी पश्चिम प्रभास, पट्टण सोमनाथतीर्थ, द्वारका, मथुरा, गया, वाराणसी, कुरूक्षेत्र, कोलादजी व तेथून शके १२१८ (इ. स. १२९६) मध्ये पंढरपुरास येऊन दाखल झाला. उद्यापनाच्या उत्सवानंतर सव्वा वर्षाच्या आतच ज्ञानदेवादी भावंडांनी समाधी घेतल्या. त्या समाधी प्रसंगी नामदेव प्रत्यक्ष हजर होते.

नामदेवांना ज्ञानदेवानंतर चौपन्न वर्षे आयुष्य लाभले. ह्या दीर्घ कालात दक्षिण व उत्तर भारतात त्यांनी अनेक तीर्थयात्रा केल्या. दक्षिण भारतात श्रीशैलशिखर, मल्लिकार्जुन, अरुणाचल, चिदंबर, विष्णूकांची, रामेश्वर, ताम्र-पर्णिका, आळुवा, कन्याकुमारी, हरिहरेश्वर, जनार्दन या क्षेत्राकडे जाऊन त्यांनी भागवतधर्माचा प्रचार केला. शके १२२० ते १२२६ च्या सहा वर्षांच्या दीर्घ कालात नामदेवांनी उत्तर भारताची यात्रा केली व ओंकार मांधाता, द्वारका, रैव-तक, मुचकुंद, स्थानेश्वर, यमुनातीर, इंद्रप्रस्थ, हस्तिनापूर, हरिद्वार, देवप्रयाग, केदार, कैलास, बद्रिनारायण, अयोध्या, मधुपुरी, गोकुळवृन्दावन, मिथिला, उज्जयिनी,

प्रयाग, काशी, गया, गंगासागर अशा अनेक तीर्थक्षेत्री जाऊन भगवद्भक्तीचा प्रचार त्याकाळच्या लोकसारस्वतात — हिंदी भाषेत केला. शके १२६१ च्या सुमारास पुन: नामदेव उत्तरेकडे गेले, असे 'जनम्साखी' व इतर पंजाबी साहित्यावरून म्हणता येते. त्यात दिलेल्या हकीकतीवरून नामदेव द्वारका, मारवाड, हरद्वार मार्गे पंजाबात गेले. प्रथम ते हरद्वारजवळ वसलेल्या शहरानपुर जिल्ह्यातील ज्वालापूर येथे गेले. तेथून अमृतसरमार्गे गुरुदासपूरला गेले. या पदयात्रेत गुरुदासपूर जिल्हा ही त्यांची कार्यभूमीच बनली. भूतविंड, मरड, भट्टिवाल, घुमान इत्यादी गावी नामदेवांची स्मृति–मंदीरे आजही उभी आहेत. हिंदी भाषिकांच्या या प्रदेशात नामदेवांनी कीर्तनसंस्थेच्या प्राचीन व्यास-पीठावरून भागवतधर्माचा प्रसार हिंदी भाषेत केला. ह्या कालात भागवत-धर्माचा राजाश्रय तुटला होता. देश म्लेच्छांकित झाला होता. अशा परिस्थितीत "सभु गोबिंदु है सभु गोबिंदु है, गोबिंदु बिनु संसार नहीं कोई॥" हा एकेश्वरवादाचा संदश या संताने देऊन भागवत धर्माची ज्योत पुनरुज्वलित करण्याचे, बहुजन समाजात विशुद्ध मानवताप्रेमाची व समतेची जाणीव निर्माण करण्याचे महान कार्य केले. नामदेवांच्या शिकवणीने प्रभावित होऊन, त्यांनी दाखवून दिलेल्या परमार्थमार्गाचे अनुसरण करणारा एक बराच मोठा वर्ग पंजाब प्रांतात निर्माण झाला व वाढत राहिला. हा वर्ग नामदेवपंथीय म्हणून तिकडे ओळखला जातो. महाराष्ट्राच्या श्रीविठ्ठल ह्या समदृष्टी प्रमुख आराध्य दैवताचा व त्याच्या महात्म्याचा पहिला परिचय करून देणारे संत ह्या दृष्टीने महाराष्ट्राच्या धार्मिक इतिहासात नामदेवांना फार मोठे स्थान द्यावे लागेल. कबीर, दादूदयाल, रैदास, रज्जबजी, स्वामी सुंदरदास, नानक, मीराबाई, नरसी मेहता इत्यादी उत्तरकालीन संतांनी नामदेवांचा उल्लेख मोठ्या आदराने केला आहे. उत्तर भारतात लोक जागृतीचे काम करून नामदेव पंढरपूर येथे आले व शके १२७२ मध्ये पांडुरंगाच्या महाद्वारी समाधिस्थ झाले.

"शतकोटी तुझे करीन अभंग" असे एक नामदेवांचे प्रतिज्ञावाक्य आहे. मात्र त्यांचे उपलब्ध मराठी अभंग २, ३३७ व हिंदी पदसंख्या ३१५ आहे. 'पंढरीक्षेत्र, चंद्रभागातीर्थ, जो विटेवर उभा नाही तो मी देवच मानीत नाही.' अशी त्यांची एकांतिक भक्ती शके १२१२ पूर्वीच्या साधनेच्या पूर्वावस्थतील अभंगात दिसून येते. तीर्थावळीचे अभंग शके १२१३ – १७ या कालातील. नंतरची रचना बालक्रीडा व कृष्णलीला ह्या प्रकरणांची, ती गुरूबोधानंतर केली असावी, असे त्यातील गुरूवंदनेवरून दिसून येते. ज्ञानदेवाची आदि आणि ज्ञानदेवांदी भावंडांची समाधि प्रकरणे शके १२१८ ते १२१९ ह्या कालातील, नामस्मरण, नामसंकीर्तन, सत्संगती, ईश्वर आणि भक्ती, संकल्प व मागणे,

दर्शनानुभ यावरील स्फुट रचना श. १२२० नंतरची असावी. शके १२२० ते १२७१ पर्यंत महाराष्ट्राबाहेर नामदेवांनी ज्या पदयात्रा केल्या त्याकालातील हिंदी रचना असावी असे स्थूलमानाने म्हणता येते. लेखन प्रेरणेच्या विशिष्ट कालाची संगती अंतर्गत प्रमाणावरून व जीवनातील घटनावरून लावता येते ती वरीलप्रमाणे.

नामदेवांच्या रचनेत आजच्या अनेक वाङमयाचे प्रवाह बीजरूपाने आढळतात. उत्कट शब्दांनी साकारलेल्या त्यांच्या अभंगवाणीत आजच्या भावकाव्याचे ( lyric ) बीज आहे. त्यांचे हे अभंगवाङ्मय म्हणजे त्यांच्या सगळ्या भावात्मक अनुभवांचे शब्दांकित प्रतिबिंब आहे. पारमार्थिक वाटचाल करीत असताना सुरवातीस आलेले अनुभव, ईश्वरी साक्षात्कारातील अनुभूती आणि त्यानंतर ज्ञानी अवस्थेतून जगाकडे पाहताना आलेले अनुभव, असे त्यांच्या भावानुभावाचे स्थूल वर्गीकरण करता येते. आरंभी देवाच्या सगुण रूपाचं त्यांना वेध लागला होता. त्यावेळच्या त्यांच्या भावना अत्यंत तीव्र आहेत, उत्कट आहेत. यानंतर ज्ञानदेवादि भावंडांची भेट झाली. आणि एका भक्तिमय वातावरणात रंगलेल्या नामदेवांच्या मनाला त्याभेटीत धक्का बसला. ईश्वर दर्शनाच्या तळमळीने त्यांची साधकाची वाटचाल सुरू झाली. ईश्वराविना तळमळणाऱ्या त्यांच्या मनाला अंधार दिसू लागला. या अवस्थेत त्यांना अपुरेपणाची तीव्र जाणीव होती. शेवटी साक्षात्काराचा क्षण आला आणि त्यांचे सर्वच जीवन साक्षात्काराच्या त्या भास्वर स्पर्शाने उजळून निघाले.

विरहिणीच्या भूमिकेतून कधी नामदेव श्रीकृष्णाकडे पाहतात. त्यावेळी त्यांच्या काव्यशैलीचे माधुर्य, भाषेचा सहजपणा, आणि वर्णनातील वेधकता जाणवल्याशिवाय राहात नाही. नामदेवांनी चितारलेला श्रीकृष्ण असा लोभस आहे. 'कानींची कुंडलें गुरुशुक्र बिंबलें ! शिरीं ते शोभिलें पिंपळपान । कंठीं वाघनखें साजिरी ते सरी । कडदोरावरी राजसासीं ॥ मधुराभक्ति पेक्षाही नामदेवाच्या कृष्णकथेतील वत्सल रसाची चित्रे मधुर आहेत.

रामजन्म, रामचरित्र, सीताशुद्धि अशी स्फुट आख्यानात्मक व संकलनात्मक रचना नामदेवांनी केली आहे. त्यातील रामाचे वर्णन पहा : पाहता सुकुमार सांवळा । लवुं विसरला डोळा ॥

नामदेव हे मराठी वाङ्मयातील आद्यपद्यचरित्रकार आहेत. ज्ञानेश्वरचरित्रविषयक सुमारे दोनशे अभंग त्यांनी रचले आहेत. या चरित्राचे तीन भाग आहेत. १. आदि (ज्ञानदेवांचा जन्म व बालपण) २. समाधि. (ज्ञानदेव व त्यांचे बंधु यांच्या समाधि कालाचे वर्णन) ३. तीर्थावळी. (स्वत: नामदेव,

ज्ञानदेव व इतर समकालीन संत यांनी केलेल्या तीर्थयात्रेचे वर्णन). या चरित्र पुराण पद्धतीची छाया दिसते.

नामदेवांनी मराठी वाङ्मयाला 'अभंग' छंदाची देणगी दिली. त्यांनी आपली भक्तिभावना अभंग छंदात व्यक्त केली आणि त्यानंतर ज्ञानदेवापासून निळोबापर्यंत सर्व संतांनी ह्या अभंग छंदास परिपूर्णता आणली. उत्कट भावना आणि विशाल सामाजिकता, सगुण व निर्गुण भक्ती, आत्मगत भावदर्शन व जिव्हाळ्याने केलेले कथासंकीर्तन यांच्या समन्वयामुळे या सर्वांचे मनोहर आणि भावरम्य दर्शन त्यांच्या कवितेत घडते. प्राचार्य वासुदेव बळवंत पटवर्धन ह्यांनी आपल्या मुंबई विद्यापीठात १९१७ साली दिलेल्या 'विल्सन फायलॉलॉजिकल व्याख्यानात' नामदेवांच्या भावकाव्यासंबंधी काढलेले पुढील उद्गार अत्यंत अन्वर्थक आहेत." नामदेवाच्या काव्यात समुद्रावर वा धरणीवर जो कधीच अवतरला नव्हता त्या प्रकाशाचा भावरम्य अनुभव येतो. जे या वृत्तिकामय जगात कधीच स्थिर झाले नाही, त्या स्वप्नाचे दर्शन होते. वासनेला केव्हाही उत्तेजित न करणाऱ्या प्रेमाची त्यात प्रचीती येते. त्यामध्ये करुणा, श्रद्धा व भक्ती यांची भावरम्यता आहे. तद्वत् मानवाचे आत्म्यावरील प्रेम आहे. त्यात भक्तीची व आध्यात्मिक प्रेमाची भावरम्यता आहे. हृदयाने हृदयास केलेले संगीतमय निवेदन आहे. स्पर्श होताच वा जागृती येताच प्रक्षुब्ध होणाऱ्या भावातुर हृदयाचे ते उद्गार आहेत."

नामदेवांना हिंदी साहित्यात निर्गुण संतमताचे आद्यप्रवर्तक मानले जाते.

●

# श्री साई कृपेचा अनुभव

**लेखक:– महादेव दत्तात्रय भिडे**

**जेथे जातो तेथे तूं माझा सांगाती**
**चालवीसी हाती धरुनीया ॥१॥**

शिर्डीचे एक महान सत्पुरुष श्रीसाईबाबा यांना ज्यांनी, आपले सद्गुरु मानून आपले सर्व आयुष्य त्यांच्या भजन पूजन व नित्य आरती, गुरुवारी करून सेवेत घालविले, त्या प. पूज्य कै. दास किसनबाबांचे मुळेच आम्ही श्रीसाईबाबांचेकडे आकर्षिले गेलो. रामनवमी, दसरा, गुरुपौर्णिमा या होणाऱ्या उत्सवात आम्ही भाग घेत असू.

रवि. दि. ४ मे सन् १९५८ हा माझ्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा दिवस. या दिवशी वृद्ध पारशी गृहस्थाचे स्वरूपात दर्शन देऊन सबुरीचा संदेश दिला व राम नामाचा मंत्र दिला. ते श्रीसाईबाबाच होत.

घरच्या प्रापंचिक अडचणी, प्रपंच मोठा, आर्थिक ओढाताण, गेला दिवस बरा म्हणण्याची रोज पाळी. त्यातच दम्याचा त्रास, त्यामुळे या दिवशी अगदी वैतागून गेलो. मानसिक त्रास असह्य झाल्याने घरातून कोठेतरी निघून जावे या विचाराने उचल खाल्ली. सायकल घेऊन घराबाहेर पडलोही. सायकल चालत होती. इतक्यात कोठे-जावयाचे हे काळ ठरविणार होता. आज श्री मेहेरबाबांचा मुक्काम पुण्यात होता व ते आपल्या भक्तांना दुपारी १०॥ ते ११॥ दर्शन देणार व यावेळी भजनांचा कार्यक्रम होणार असे पेपरमध्ये वाचल्याचे आठवले.

कॅम्पच्या रस्त्याने निघालो. बंडगार्डनरोड पाटी दिसली. त्या रोडवरून जात असताना, एक वृद्ध पार्शी गृहस्थ वय ८० चे पुढे डोक्यावर पार्शी टोपी हातात छत्री व दुसऱ्या हातात तुळशीची माळ ओढीत चाललेला दिसला त्यास मेहरबाबांचा पत्ता 'गुरु प्रसाद' बंगला कोठे हे विचारावे, असा विचार आला मात्र. तोच या पार्शी गृहस्थाने तोच प्रश्न मला विचारला. आश्चर्य वाटले. मीही तिकडेच जातो तूही माझे बरोबर चल. आपण दोघेही हळूहळू चालत जाऊ असे त्याने म्हणताच मला त्याच्या बरोबर चालत जाणे भाग पडले. पार्शी गृहस्थाचे तोंडाने ॐ नमःशिवाय तुळशीची माळ ओढणे चालूच होते. आम्ही गुरुप्रसाद बंगल्यात आलो. मेहेरबाबांचे भोवती भक्तांचा गराडा मोठा पडलेला व भजन रंगात आलेले पाहून आनंद वाटला. पण दर्शन कसे घडेल ? याचा विचार आला. तोच बरोबरचा पार्शी गृहस्थ मला म्हणाला "मी पुढे जातो तू माझा कोट धरून ये. मी दर्शन घेताच तू घे. काळजी करू नको असे म्हणत तो तडक निघालाही. मेहरबाबांची व त्या पार्शी गृहस्थांची दृष्टादृष्ट होताच एकमेकांनी एकमेकांना प्रेमाने आलिंगन दिले व त्यावेळी मेहेरबाबांनी त्यास भेट म्हणून एक गुलाबाचे फूल दिले व खुणा करून ते एकमेक बोललेही. मीही त्या पार्शी गृहस्थाचे पाठोपाठ मेहेरबाबांचे दर्शन घेतले. आनंद झाला.

दर्शन घेऊन दोघेही बाहेर आलो. मी आठवण म्हणून मेहेरबाबांचा एक फोटो विकत घेतला. मी त्या पार्शी गृहस्थाचे आभार मानले व घरी जातो म्हणताच त्यांनी मला जाऊ दिले नाही. पार्शीबाबा म्हणाले "बेटा, हमारी झोपडी तर देख" हे त्यांचे म्हणणे मोडवेना. मीही त्याबरोबर कॅम्पचे रस्त्याने

पार्शी गृहस्थाचे घरी जाणेस निघालो. वाटेत त्यांनी मला कोण ? कुठला ? कोठे राहणार ? हे विचारले व ब्राम्हण का ! विचारले. मी त्यांना माझा पत्ता सांगितला व होय ब्राम्हण म्हणून सांगितले. त्यावर काय करतो उपासना वगैरेबद्दल विचारता मी त्यास सांगितले की बाबा "मी गुरू केला नाही, कधी कधी राम राम म्हणतो. दासबोध वाचतो. मी राम उपासक आहे. हे ऐकताच वाटेतच **बाबा एकदम उभे राहिले व म्हणाले "ऐसा बोलनेका नहीं –" श्रीराम जयराम जयजयराम" असे त्रिवार सांगून तीन वेळा माझे कडून म्हणवून घेतले व त्याचवेळी आकाशाकडे पाहात पुटपुटत माझे डोकीवर आपला हात ठेवला. व ते स्तब्ध झाले.** मला अत्यंत आनंद वाटला. पण कुतुहल वाढले.

आम्ही रस्त्याने जात असताना मीही बाबांना प्रश्न केला की बाबा तुम्ही पार्शी दिसता. अग्नीउपासक, तोंडाने ॐ नमः शिवाय मंत्र जप चालू, व नमाज ही पाचवेळ पढल्या शिवाय राहात नाही म्हणता याचे आश्चर्य वाटते. आपण कोण ? आपला गुरु कोण ? आपणास गुरुमंत्र कोणाचा मिळाला हे सांगाल का ? प्रथम त्यांनी टाळाटाळ केली. पण मी थोडा हट्ट धरताच ते पार्शीगृहस्थ मला म्हणाले "बेटा सर्व धर्म एकच आहेत." मी कोणास माझा गुरु कोण हे सांगत नाही. पण माझा आग्रह पाहताच ते पार्शी गृहस्थ **'बेटा, "हमारा गुरु साईबाबा" म्हणाले मात्र त्यांच्या सर्व अंगास कंप सुटला व ते थरथर कांपू लागले.** मीही थोडा घाबरलोच. रस्त्यास कोणी नाही आम्ही दोघेच. रस्त्यातच हा गृहस्थ पडला तर पंचाईत.

मी त्या वृद्ध गृहस्थास म्हटले "बाबा थोडावेळ खाली बसा ! मी रिक्षा आणतो. तुम्हास घरी पोचवितो. त्यावर ते म्हणाले "बेटा घाबरू नको. माझ्या गुरुचे नाव मी घेताच मला असा कंप सुटतो. अंग थरथर कापू लागते. म्हणून कोणास माझे गुरुचे नाव सांगत नाही. थोड्यावेळाने त्यांना बरे वाटताच असेच हळूहळू चालत आम्ही त्या पार्शी गृहस्थाचे कॅम्प मधील घरी आलो.

दारासमोर रांगोळी घातली होती. आम्ही आत जाताच मला या घरातील खोलीत सर्व धर्मीय संत व अवतारादिकांचे फोटो सर्व देव व देवींचे फोटो लावलेले दिसले, व त्याबरोबर संताची वचने व उपदेशक म्हणी यांच्या पाट्याही लाविलेल्या मी पाहिल्या. या पार्शी गृहस्थाने मला फिरून सर्व दाखविले, व त्याबरोबरच दारावरील भिंतीचे वरचे बाजूला लाविलेल्या एका पाटीकडे बोट दाखविले व म्हणाले बेटा "यह देख क्या लिखा है" "ये भी दिन जायेंगे" मत फिकीर करना सबूरी धरना, मलाच ही पाटी प्रथम घरी येताच त्याने का दाखविली ? याचा उलगडा झाला. मनोमन खात्री पटली. मी सकाळीच घरून वैतागाने निघालो होतो. त्यासाठी ही पाटी मला त्यानी दाखविली, व सबुराचा संदेश दिला, असेच मला वाटते.

मी पाटी पाहात असतानाच पार्शी गृहस्थाने जेवण झाले का ? विचारले मी नाहीं म्हणताच तू ब्राम्हण ना ! काही खाणार का ? विचारले. मी त्याना 'प्रेमसे दिये तर जरूर खाएंगे' म्हणताच त्यांनी मला आत नेले. तेथे एक मोठे गोल टेबल मांडलेले होते. भोवती खुर्च्या होत्या. त्यावर आम्ही बसलो.

त्या पार्शी वृद्ध गृहस्थाचे कुटुंब वृद्ध झालेले अंगावर सुरकुत्या पडलेल्या व तोंडावर तेज होते. त्यांनी माझे पुढे पाव व भाजी ठेवली, व गार पाणी दिले. मी त्यांना (पार्शी गृहस्थास) "आपण खाल्ले तर मी खाईन, म्हणताच तो म्हणाला. "हमारा नमाजाची वेळ झाली नमाज पढून मी खाईन तू खा! मी पाव व भाजी खाल्ली गार पाणी प्यालो. मन एकदम शांत झाले. आम्ही नंतर बाहेर आलो. बसलो. मी त्या पार्शी कुटुंबाचे आभार मानले व त्यांचे पायावर डोके ठेवले व म्हटले बाबा, तुमचे मुळेच मला मेहेरबाबांचे दर्शन घडले ही साईबाबांची कृपा होय, आपण साईबाबाच आहात.

मी बाहेर निघतानाही त्या गृहस्थांनी मला पुन्हा सर्व देव देविंचे व सत् पुरुषांचे फोटो दाखविले व शिवाय पुन्हा ती "ए बी दिन जायेगें पाटी दाखविली व सांगितले की बेटा मत फिकीर करना सबूरी धरना, तुला ज्या ज्या वेळी वाटेल त्या वेळी येत जा. दुपारी १ ते ४ मी घरी असतो."

माझी साईबाबांची उपासना चालू होतीच. मी वैतागून घरातून बाहेर पडलो होतो. गांजलो होतो. अशा मनस्थितीत मला वरील पाटी व सत्पुरुषाचे दर्शन घडवून व मला ओळख पूर्वीची काहीही नसताना घरी बोलावून व नेऊन प्रसाद भाजी पाव खावयास दिले, व पाणीही दिले व मन शांत करून घरी पाठविले. ही सर्व साईबाबांची करणी असेच मी समजतो. हा दिवस आठवला की माझे डोळ्यात आनंदाश्रू उभे राहतात. मी त्या पार्शी गृहस्थांचे घरून निघालो त्यावेळीं त्यांचे घरी असलेल्या तुळशीच्या माळेपैकी एक माळ मला आठवण म्हणून द्या अशी विनंती केली. पण त्यांनी मला दिली नाही व सांगितले की, 'बेटा तुझी वेळ अजून आलेली नाही. वेळ येईल तेव्हा देईन'.

या पार्शी गृहस्थाचे घरी पुन्हा दुसरे दिवशी दुपारी गेलो व बोलत बसलो, व पुन्हा माळ देणेबद्दल विचारले पण नकार मिळाला. त्यावेळी घरी त्याच्या १०, १५ माळा टांगलेल्या होत्या त्यातल्या पैकी एक देणेस काहींच हरकत नाहीं न देण्याचा काय हेतू होता बाबा जाणे त्यावर मी एक दोन वेळा गेलो. व पुन्हा केव्हा येऊ त्यांना विचारले त्यावर ते म्हणाले 'बेटा तू आता माझेकडे येऊ नको. मी जेव्हा अवतार मधे येईन तेव्हा मीच तुझे घरी येईन, असे आश्वासन दिले, व मला मेहेरबाबा म्हणतात सांगितले.

# श्री संत गुलाबबाबा

● डॉ. अनिल जायस्वाल, नागपूर

● संपूर्ण महाराष्ट्रात तरी श्रीसंत गुलाबबावांना न ओळखणारी व्यक्ती क्वचितच सापडेल. आता तर त्यांचे नाव देशातल्या कोनाकोपऱ्यातही पसरत आहे. श्रीबाबांचे नाव घेतल्याबरोबर जसे गुलाबाचे फुल दृष्टीसमोर उभे राहते तसेच मनाला भुलण पाडणाऱ्या त्यांच्या चेहऱ्यावर पसरलेल्या तेजाकडे बघितल्यास मनातील विकल्प पार नाहीसा होतो. त्यांच्या सान्निध्यात असताना आपणास क्षणभर तरी का होईना या सांसारीक भोगांचा विसर पडतोच. दर्शनार्थ येणारी व्यक्ती आस्तिक असो अथवा नास्तिक श्रीबाबांच्या कोमल, सुंदर व मनाला आल्हादीत करणाऱ्या चेहऱ्याकडे पाहताच त्याला नमावेच लागते. ज्याप्रमाणे गुलाबाच्या झाडाला काटे असतात याचप्रमाणे श्रीगुलाबबाबांचे जीवनसुद्धा काटेरी दुःखाने व कष्टाने भरलेले आहे. पण ते चेहऱ्यावर कधीच झळकत नाहीं. उलट दुःखी माणसाची त्यांच्यावर नजर पडताच तोसुद्धा एक विशिष्ट प्रकारचे सुख अनुभवितो व त्याने त्याचे देखिल मन प्रफुल्लीत होऊन तो स्वतःचे दुःख विसरतो.



**बालपण :** जी थोडी फार माहिती लेखकाला उपलब्ध झाली त्यानुसार श्रीगुलाबबाबांचा जन्म ता. १-७-१९३२ साली वऱ्हाडात सूर्जीजवळ असणाऱ्या टाकळखेडे या गावी झाला. घरची परिस्थिती फारच नाजूक. गोकुळातल्या श्रीकृष्णासारखे घरची गाई-ढोरे चरावयास नेण्याचे त्यांना एक प्रकारचे वेडच होते. यातच त्यांना आनंद वाटे. संध्याकाळ झाली की रानावनातून परतावे. जी काहीं चटणी-भाकर वा कांदा-भाकर उपलब्ध असेल तेच मोठ्या

प्रेमाने व संतोषाने ग्रहण करावे. हीच त्यांची याकाळी असणारी दिनचर्या. भाऊ आणि बहिणींच्या आश्रयात जीवन कंठविणाऱ्या श्रीबाबांचे वय जेमतेम ७–८ वर्षाचे असेल. असेच एका संध्याकाळी रानातून गाई वगैरे घेऊन परत आल्यावर यांनी हात पाय वगैरे धुतले आणि

**पाटावर बैसला गुलाब**
**वाढावया न कोणी येत !**
**म्हणे, भुक लागली माय,**
**वाढ थाली वहिनी गे !!**

अशी करूणस्वरात हाक मारली. तो दिवस कोणत्यातरी सणाचा होता. पुरणपोळी वगैरे खाऊन घरातील सर्व मंडळी झोपलेली होती. बहीणीची झोपमोड झाल्याकारणास्तव ती बालरूप श्री बाबांना रागानेच व टोचून म्हणाली :–

**"मोठा आला कामावरूनी**
**घे उठूनी आपल्या हाती ।**
**आधी करी कमाई**
**मग म्हण आम्हांस "उठा बाई" !**
**रिकाम्या माणसां पायी**
**त्रास कां तो आम्हांला !"**

असले बोलणे ऐकताच श्री बाबांच्या डोळयात अश्रू आले. त्यांनी आपले मन आवरले.

**परमार्थाकडे ओढ :** कधी कोणास टोचून न बोलणारे, शांत व सरळ व्यक्तीत्वांच्या श्रीबाबांनी मोठ्या आशेने आईकडे बघितले व मनातच विचार केला की "आई-वडीलांचे देखील जिथे चालत नाही तिथे आपले तरी काय चालणार ! हा संसार व्यर्थ आहे. आपण ज्याचे चालते त्याच्याच नादी लागलेले बरे," व त्या दिवसापासून श्रीबाबांना परमेश्वराचा ओढा लागला. श्रीकृष्णरूपी परमपिता परमात्मा त्यांना आठवला व ते त्यातच स्वतःला विसरून गुंग झाले. नेहमी त्यांचेच नाव "गोपाला" गोपाला " गोपाला" व त्याचेच ध्यान. वयाच्या बाराव्या वर्षीच यांना आषाढ एकादशीच्या दिंडीसोबत श्रीक्षेत्र पंढरपूरास श्री. पंढरीनाथाच्या दर्शनार्थ जाण्याचे भाग्य लाभले व तेव्हापासून आजतागायत ते नियमितपणे वारी करीत असतात. पंढरपुरला असताना त्या कोवळ्या वयातसुद्धा रात्र अन् दिवस श्रीपंढरीच्या मूर्तीकडे ते पहात ध्यानस्त बसत. देवळातील पंडे त्यांना रागावीत, देवळाबाहेरसुद्धा काढीत. परंतु श्री बाबांवर याचा काहीच परिणाम होत नसे. डोळेभरून पांडुरंगाचे दर्शन ते एकाग्रचित्ताने करीत.

**गुरुप्राप्ति व गोपालकाला :** वयाच्या अठराव्या वर्षी एका रात्री त्यांनी आपल्या माता-पित्यांना व भाऊ-भावजयीला चरण वंदना करुन व त्यांचे मुक आशिर्वाद प्राप्त करुन आपल्या गावाला कायमचा रामराम ठोकला. आणि नंतर काहीकाळ सूर्जी-अंजनगावातील माळी, बारई भक्तांसोबतच ते रमले. सर्वांसमोर वीणा वाजवित श्रीबाबा ईश्वराचे भजन-चिंतन करीत. ईश्वरीकृपेनें प्राप्त आलेल्या गळ्याने ते देवाला आळवित. श्री साईबाबा, गजानन महाराज, ताजुद्दीनबाबा, गोंभाजी, मुंगसाजी व गाडगे महाराज या सर्वांविषयी त्यांनी कधीही भेदभाव केला नाही. सर्व संत एकच व ईश्वरही एकच, असा त्यांचा दृढ विश्वास. या सर्वांविर त्यांची समान निष्ठा. त्यांना न कधी खाण्याची फिकर न राहण्याची. कधी-कधी श्रीबाबा एकसारखे ईश्वर चिंतनात बसलेले आढळीत. परमेश्वर सर्व चराचरात व प्राणिमात्रात व्याप्त आहे व सर्वसाधारण लोकांचीच सेवा म्हणजेच ईश्वराची सेवा, असे त्यांचे विचार. श्रीकृष्णाची मूर्ती हृदयात आणि "गोपाला " गोपाला" हे नाम सतत मुखात हीच त्यांची भक्ती. प्रत्यक्ष श्रीगाडगे महाराजांना श्रीबाबा शरण गेले असताना महाराजांनी त्यांना म्हटले की, ।।गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला।। हेच नामस्मरण तू नेहमी कर. भविष्यात तुला गुरु नामानंद लाभेलच की. कसलीच काळजी करु नकोस. हा आमचा आशिर्वाद आहे ।। गोपालास पाहण्याची तीव्र उत्कंठा असणाऱ्या या विभूतीने श्रीगाडगे महाराजांची व पुढे दोन वर्षांनी प्राप्त झालेल्या श्री नामानंद नामे गुरुची फारच सेवा केली व त्यांच्याच कृपेने श्री गुलाबबावांना ईश्वर प्राप्तीचा मार्ग लाभला.

**नेमांत नेम हरीस्मरण**
**दानांत दान अन्नदान**

हे त्यांच्या मनास पटले व आता जर आपण श्री संत गुलाब बावांकडे न्याहाळून बघितले तर असा भास होतो की प्रत्यक्ष "गोकुळाचा श्रीकृष्णच" आपल्या समोर आहे की काय? इतके ईश्वराशी एकरूप झालेले ते दिसतात. म्हणूनच म्हटलेले आहे की,

**गळूनी जातसे धर्म ज्या ज्या वेळेस अर्जुना**
**अधर्म उठतो भारी तेव्हां मी जन्म घेतसे ।**
**राखावया जगी संता दुष्टा दूर करावया**
**स्थापवया पुन्हां धर्म जन्मतो मी युगीं युगीं ।**

श्री संत गुलाबबाबा कधीही जास्तकाळ पर्यंत एके ठिकाणीं टिकत नाहीत. आता इथे तर थोडयाच वेळात कुठं दुसरीकडे. असे सतत ते वावरताना आढळतात.

पारस गावची गोष्ट. तिथे श्री बाबांच्या कृपेने फार मोठा 'भंडारा' साजरा करण्यात आला होता. गावाबाहेरील मंदीराजवळ हजारोंवर जनसमुदाय गोळा होता. परंतु गावातील विहीरी सर्व कोरडया असल्याकारणाने पाण्याचा अभाव होता. श्री संत गुलाबबाबांनी विहीरीला हात जोडून पूजा-प्रार्थना केली आणि काय आश्चर्य ! विपुल प्रमाणात पाणी उपलब्ध होऊन तिथे जमलेल्या मंडळींनी यथेष्ठ भोजन केले.

देवादिक गण स्वर्ग सोडून त्यांच्या गोपालकाल्याच्या एका कणालासुद्धा पावून धन्य होत असतील, इतक्या उत्तम रीतीने ते दहीहांडी व गोपालकाला साजरा करीत असतात. आपणास या कलीयुगी कृष्णाद्वारें मिळालेल्या प्रसादास आपले भाग्यच म्हणावे लागेल.

**मानव सेवा हीच ईश्वरसेवा :**

एकदा सांगवली खेडयात असाच भंडारा करण्यात आला होता. त्या भक्त समुदायात आलेली ती एक स्त्री होती. तिचा या संतावर मुळीच विश्वास नसल्याकारणाने श्रीगुलाबबाबांना अर्पणास्तव आणलेल्या दुधात तिने विष कालवून त्यांना पाजले. श्री संत गुलाब बाबांनी ते दुध गिळंकृत केले व त्याच स्त्रीच्या स्वप्नात जाऊन म्हणाले :–

> "माते ! तुला जी पोटशूळाची बाधा झालेली आहे त्याचे कारण तू मला पाजलेले विष आहे. तू त्वरीत निघून काटेल-कोलादला ये व तेथे मी आपल्या योगशक्ती द्वारे उत्पन्न केलेल्या झऱ्यातील तीर्थ तू घे म्हणजे तुझे रोग निवारण होईल."

वाचकहो ! त्या स्त्रीने लगेच काटेल-कोलादला तीन वाऱ्या केल्या व ती स्वस्थ झाली. आपल्या शत्रूस देखिल काही बाधा उत्पन्न झाल्यास श्री संत गुलाबबाबा कसे धाऊन येतात हे यावरून स्पष्ट होते.

**तिर्थक्षेत्र काटेल–कोलाद :**

पुढे काटेल–कोलादलाच नदीच्या काठी जिथे त्यांनी आपल्या योग सामर्थ्याने हा झरा निर्माण केला तिथेच एक झोपडे टाकून आश्रम स्थापित केले. माळेगांव, मुंबई व नागपुरच्या अनेक भक्तांनी सहाय्य करून अकोला जिल्ह्यातील श्री गजानन महाराजांचे शेगाव पासून अठरा मैलावर असणाऱ्या या गावाला श्री तिर्थक्षेत्राचे स्वरूप प्राप्त करून दिलेले आहे. त्या "पवित्र झऱ्यातिल" पाणी कितीही काढले तरी ते काठोकाठ तुडुंब भरलेले असते. तिथे अनेक देवादिकांची मंदीरे असून स्वतः श्रीबाबा करीता एक वेगळेच मंदीर उभारले गेलेले आहे. परंतु श्री बाबांनी अद्याप ज्या मंदीराच्या कळसाचा

भाग अर्धवट रोकून ठेवलेला आहे. त्यांचे म्हणणे आहे की समाधिस्त झाल्यावर मी इथेच वास करीन व त्यानंतरच या मंदीराच्या कळस पूर्ण होईल. वाचक-बंधूनो! जो आपला काळ सतत डोळ्या समोर पाहतो तोच खरा संत. त्याला या नश्वर संसारातील वस्तु काय लुभावणार. म्हणूनच ते सांगत असतात "मृत्युकाळी तुमच्या सोबत काहीच जाणार नाहीं. आता तरी वेळ आहे.



**श्री संत गुलाब बाबा**

जे काही यथाशक्ति तुम्ही गोर-गरिबांच्या सहायतार्थ दान करू शकता ते आजच व आताच करा. काळ केव्हा झडप मारेल हे सांगता येत नाहीं. तुमचे दान मी स्वीकारण्यास झोळी पसरून उभा आहे. या आणि पुण्य कमवा." असा हा दक्षिणा मागणारा संत दिवस-रात्र भक्त कल्याणार्थ खपत असतो. दक्षिणा दिली त्यांचे पण भले हो, नाही दिली त्यांचेही भले हो असे श्री संत गुलाबबाबा ईश्वराला आळवित असतात. परंतु मोह मायेत गुरफटलेले काही नास्तिक बंधु त्यांना संत मानीत नाहीत. अलीकडेच त्यांच्या करवीं झालेल्या काही दैविक चमत्कारांना पाहून आता तेसुद्धा त्यांना ईश्वरीय-शक्ती समजू लागले आहेत. परंतु अशा नास्तिक बंधूची कमी नसते. अहो, कडू कारले तुपात तळले, साखरेत घोळले तरी कडू ते कडूच राहाणार. त्यांना गोडपणा येणार नाहीं. हा तर आपआपल्या श्रद्धा व विश्वासाचा प्रश्न आहे. श्रीसंत गुलाबबाबा जेव्हा स्वतः-च्या शत्रूच्या मदतीसाठी धावतात तेव्हा आपलेसुद्धा कर्तव्य आहे की अशा निंदा करणाऱ्या पामरांबद्दल त्यांना काही एक न म्हणता त्यांच्याविषयी गोष्ट केलेली बरी. श्रीतिर्थ क्षेत्र काटेल-कोलादचे श्रीसंत गुलाबबाबांचे आश्रम एका फार मोठ्या क्षेत्रफळात पसरलेले असून चोहोबाजूंनी सिमेंटच्या कंपाऊंडनी वेष्टिलेले आहे. मुख्य प्रवेशद्वार श्री साईबाबांच्या नावावर असून आतमध्ये अनेक द्वारे निरनिराळ्या संतांच्या नावानी सुशोभित केली गेलेली आहेत. राहण्या व थांबण्याकरिता उत्तम व्यवस्था असून स्वयंपाक करणाऱ्यास चुलीतील लाकडांपासून पूर्ण शिधा सामुग्री आश्रमातर्फे पुरविली जाते. या सर्व सुखसोयी मोफत उपलब्ध आहेत. श्रीसंत गुलाबबाबा येथे असताना दिवसभर ते झोपडीत बसतात व रात्री जवळच असलेल्या स्मशानभूमीत उघडधावर झोपतात. या स्मशानभूमीत कोणीच एकटे जाऊ शकत नाहीं. कारण पुष्कळ मोठमोठाले

विषारी सर्प इथे सरपटताना आढळतात. याच ठिकाणी ५ औदुंबराचे वृक्ष आहेत. त्यांच्याच छायेखाली श्रीबाबा झोपतात. श्री बाबांच्या या आश्रमात जवळ जवळ सर्व संतांच्या मूर्तिचा समावेश करण्यात आलेला आहे. याठिकाणी गोकुळ अष्टमी व महाशिवरात्रीला दरवर्षी फार मोठा उत्सव होतो, फार मोठी जत्रा भरते, व लाखोंनी जनसमुदाय दुरदूरून एकत्रित होतो. येथिल वातावरण-सुद्धा श्रीक्षेत्र शिर्डीच्या वातावरणासारखेच वाटते. पैकी कोणत्या तरी एका जत्रेस हजर राहून वाचकांनी स्वतःच अनुभव घ्यावा.

> **नसे गर्व अंगी सदा वीतरागी ।**
> **क्षमा शांती भोगी दयादक्ष योगी ॥**
> **नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा**
> **इहीं लक्षणी जाणि जे योगिरांणा ॥**

या समर्थ श्री रामदासांच्या श्लोकानुसार श्री संत गुलाबबाबा योगी सत्पुरुष आहेत ही गोष्ट निर्विवाद आहे.

### प्रेम म्हणजेच परमेश्वर

"शत्रुत्वाला विसरून दुसऱ्याच्या हितासाठीच झटण्यात खरा आनंद आहे. अरे ! ही लढाई-तंटे कशाला ? सर्व प्रेमळपणाने नांदा. जीवन क्षणभंगुर आहे. आपल्या सोबत या संसारातील कोणतीच वस्तू बरोबर जाणार नाही. सर्व काही इथल्या इथेच राहणार आहे. हा सगळा मोहमायेचा पसारा पसरला आहे. त्याला दूर करा. जे काही तुमच्याजवळ आहे ते चार चौघात मिळून खा. तिजोरीत प्रमाणाबाहेर कोंबून ठेऊ नका. अरे मानवा, जरा डोळे उघडून पहा. तुझा शेजारी दारिद्र्याने त्रस्त असून दोन दिवसांचा भुकेला आहे, आणि तुझी इकडे मेजवानी चाललेली आहे. त्यालाही बोलव. आपल्या ताटातील दोन घास यालाही दे. त्याचीही क्षुधा शांत कर. मग बघ, तुझ्या मनाला काय अपरिमित आनंद प्राप्त होतो." असे ते नेहमी सांगत असतात. ते कान फुंक-णारे गुरू नसून त्यांनी कोणास आपला शिष्यही केलेला नाही.

**स्वानुभव** : मी सुद्धा आठ वर्षापूर्वी नास्तिक विचारांचा प्राणी होतो. नंतर सच्चिदानंद सद्गुरू श्रीसाईनाथ महाराजांनी आपल्याकडे ओढून, कसे माझ्या विचारात परिवर्तन घडविले, व मी नास्तिकचा आस्तिक कसा झालो हे मी आपणास श्रीसाईलीला मासिक जून १९७५ च्या अंकात सांगितलेच आहे. श्रीसंत गुलाबबाबांनी यानंतरच मला दृष्टांत दिले व मला आपल्याकडे येण्यास भाग पाडले ती गोष्ट अशी,

एकदा स्वप्न पडले की मी नाईक रोडवरील यांच्या निवासस्थानी जात असताना मार्गातच देवीचे देऊळ दिसले. श्रीदेवी कमळांच्या फुलांनी सजलेली

व हिरव्या बांगड्या घालून होती. हुबेहुब श्रीक्षेत्र कोराडीचे श्री महालक्ष्मीचे दैवत. मी बाजूच्या खोलीत डोकावले तर तिथे जात्याचे पाट व एक धान्य भरलेले पोतें (द्वारकामाईचे दृष्य) दिसले. नंतर मी श्री संत गुलाबबाबांच्या निवास स्थानी पोहोचलो असताना, द्वारकामाईत बसलेले साक्षात् श्रीसाईबाबा त्यांच्या गादीवर विराजमान झालेले दिसले. मी हार घातला व आरती करून साष्टांग नमस्कार केला.

वरील दृष्टांतावरून मला या गोष्टीची जाणीव झाली की आपले "चालते बोलते साईबाबा" ते हेच असून श्री सद्‌गुरू साईबाबांशी ते पूर्णपणे एकरूप आहेत. ्यानंतर अधून मधून वेळ काढून मी श्री संत गुलाबबाबा नागपूरला असताना त्यांच्या दर्शनार्थ जात असतो.

एकदा असे घडले की श्री गुलाबबाबा लेम्ब्रेटावर बसून कोणा एका भक्ता-सोबत कुठं तरी जात असताना आकस्मिक दुर्घटनेने त्यांच्या डावीकडील खांद्यास जबर मुका मार बसला. त्यांनी उपचारार्थ मला बोलावून आणण्यासाठी कोणा एका भक्तास मजकडे पाठविले. माझी प्रकृति ठीक नसतानाही मी आपली पेटी घेऊन त्यांच्याकडे गेलो. श्रीबाबा मला विचारतात, "कसं काय डॉक्टर काय काय देणार ?" मी म्हटले "बाबा ! ही तर सर्व आपली लीला आहे. कोणावर आलेले संकट आपण त्याला वाचविण्यासाठी स्वतःवर ओढून घेतलेत. व मला बोलावणे पाठविले, हेच माझे सुदैव. मी विमूढ, अल्पमती पामर आपणास काय देऊ शकणार व माझे काय सामर्थ्य. जी काही उपाययोजना आपण माझ्या बुद्धीस प्रेरित कराल तेच मी देणार." श्रीबाबांच्या आज्ञेस्तव मी जखम बघून उपाययोजना केली, व श्रीबाबांनी माझ्या गळ्यात एक हार टाकून एक मोसंबी प्रसाद रूपाने देऊन मला परत पाठविले. वाचकांनो तुम्हास कदाचित आश्चर्य वाटेल की नेमक्या दुसऱ्या दिवसापासूनच माझे मीठ अजिबात खाणे बंद पडले. माझी चव बदलली. मिठाचे एक कण सुद्धा नकोसे झाले. आज या गोष्टीस अंदाजे तीन वर्षे झालीत. माझ्या आहारात मीठ पूर्णपणे वर्ज्य आहे. माझा वाढलेला रक्तचाप Blood-Pressure) अगदी नॉर्मल पर्यंत पोहचलेला आहे. मी श्रीबाबांच्या इलाजास्तव त्यांच्याकडे गेलो ही समजूत चुकीची आहे. त्यांनीच माझ्या स्वतःच्या इलाजाकरिता आपल्याकडे बोलाविले होते. माझी बिघडलेली प्रकृती सुधारली असून मी पूर्णपणे स्वस्थ आहे. मग जर माझा विश्वास श्रीसंत गुलाबबाबांवर जास्तच दृढ झाला. यात माझा तरी काय दोष ? याचा पाठकांनी तरी विचार करावा. सुशिक्षित डॉक्टर मित्रमंडळी पैकी अनेकजण माझी टिंगल उडवित असतात, की काय हे 'बाबा—बाबा' घेऊन बसलास म्हणून ! परंतु त्यांचीही श्री साईबाबावर थोडी

जरी का होईना श्रद्धा जडली गेलेली आहे. हे खालील उदाहरणावरून स्पष्ट होईल.

गोष्ट आक्टोबर १९७४ ची आहे. येथील मेडीकल कॉलेजात वार्ड २५ मध्ये माझ्या नातेवाईकांची मुलगी श्रीमती शालीनी ही इतकी सिरीयस झाली की शेवटी माझ्या सर्व डॉक्टर मित्रमंडळींनी हात टेकले तिला (Tuberculous Meningitis with Post artum Eclampsia with Cerebral Malaria हा रोग असल्या कारणाने तिला एकसारखे झटके (Convulsions) येणे सुरू होते. शेवटी त्या वार्डाचे इन्चार्ज डॉक्टर माझे मित्र असल्याकारणाने मजजवळ येऊन माझी टिंगल उडविण्याच्या उद्देशाने ते म्हणाले "मित्रा दाखव, दाखव, आता तरी तुझे साईबाबा काय करू शकतात ते." लगेच मी वार्डातच असणाऱ्या कोणा रूग्णाद्वारे समर्पित केलेल्या श्री साईबाबांच्या फोटोस मानस वंदना करून म्हटले, "अरे श्रीसाईबाबांची प्रचिती तुला नाही. ते तर यापेक्षाही मोठमोठे रोगी दुरुस्त करू शकतात" इतकेच आमच्यात बोलणे झाले. रूग्ण मुलीच्या आईनेसुद्धा श्री साईबाबांना विनविले व काही नवस सुद्धा केला. आश्चर्य असे की तेव्हापासूनच शालीनींच्या प्रकृतीत सुधार होऊन दुसऱ्या दिवशी सकाळीच तिने डोळे उघडले. झटके पूर्णपणे थांबले हे म्हणावयास नकोच. आता तर ती सुखरूपपणे आपल्या सासुरवाडीस नांदत आहे. अर्थातच त्या नातेवाईकांनाही वार्डातल्या त्या श्री साईबाबांच्या छबीस पुजा वगैरे करून हार अर्पित केला व पूर्ण वार्डात प्रसाद वितरण केला. आता तेथील माझ्या अनेक डॉक्टर मित्रांना श्री साईबाबांबद्दल आस्था निर्माण झालेली असून त्यातील काहीजण शिर्डीला जाऊन आल्याचे नुकतेच कळलेले आहे.

श्रीसंत गुलाबबाबांच्या आज्ञेनुसार मी माझ्या मातोश्रींना घेऊन गोकुळ-अष्टमी १९७३ निमित्त, श्रीक्षेत्र काटेल-कोलादला जाण्याकरिता निघालो. श्री गुलाबबाबा इतर भक्तांसोबत नेमके आमच्याच डब्यात शिरले, व तितकाच काळ त्यांच्या सोबत आम्हांस प्रवास करण्यास मिळाला हे आमचे भाग्य म्हणावे लागेल. नागपुर रेल्वे स्टेशनावरील मोठमोठ्या अधिकारी वर्गापासून कुली पर्यंत त्यांच्या चरणवंदनेस तिथे एकत्रित झाले होते. गाडीसुद्धा मुद्दाम त्यांच्याचकरिता पाच मिनिटं लेट सोडण्यात आली. कारण त्या गाडीचे गार्ड-साहेब व इंजिन ड्रायव्हरसुद्धा त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी आलेले होते. संपूर्ण डबा फुलहाराने झाकला गेला. हार जास्त झाल्या कारणाने श्रीबाबा ते इकडे तिकडे विसकळून फेकीत. इतक्या जनसमुदायात सुद्धा श्रीबाबा प्रत्येक भक्ताचे नाव घेऊन त्याची विचारपूस करीत होते. निदान साधारण माणसाच्या डोक्यात तरी इतकी नावे व ओळख राहणे असंभवच म्हणावे लागेल. अनेक

भक्तांपैकी दोन गुजराथी इसमांना श्रीबाबानी मजजवळ बसवून त्यांची काळजी वाहण्याची सक्त ताकीद मला दिली होती. त्या गुजराथ्यांसोबत काहीच सामान नव्हते. परंतु शंभर-शंभरच्या नोटांच्या अनेक गड्डया त्यांच्या खिशात उपलब्ध होत्या. त्या दाखवून ते भक्त मला म्हणाले, "हम तो सिर्फ दर्शन के वास्ते बाबा के घर गये थे। हमें क्या मालूम बाबा काटेल जा रहे हैं। लेकिन बाबाने हमें जबरदस्ती सफर के लिये खिचके लाया। टाईम ना होनेकी वजहसे हम अपना सामान भी होटलसे नहीं ला सके। हमारे पास तो जेबमें यह सिर्फ पैसा है!" पुढे अर्थातच श्रीक्षेत्र काटेल-कोलादला असताना त्यांना माझेच कपडे अंगीकार करणे भाग पडले. श्रीबाबानी त्यांना दाखवून दिले की हे पैसे सुद्धा, ज्याचा त्यांना अभिमान आहे, कित्येकवेळा काही कामाचे ठरत नाहीत. श्रीमंतांना सुद्धा वेळप्रसंगी दुसऱ्या गोरगरिबाचे कपडे उसने घेऊन लज्जा-रक्षणार्थ घालावे लागतात. रुपयांचे महत्त्व कुठपर्यंत आहे हे त्यांना कळून चुकले व त्यांचा श्रीमंतीचा गर्व पार नाहीसा झाला. रेल्वेद्वारे श्री बाबासोबत प्रवास करताना जेव्हा आम्ही सर्व शेगाव रेल्वे स्थानकावर उतरलो, तेव्हा श्रीसंत गुलाबबाबांनी पुढे येऊन माझ्या व मातोश्रींच्या हातचे सामान स्वतः घेऊन इतर भक्तांच्या स्वाधीन केले व त्यांनी स्वतःच आम्हाला श्री गजानन महाराजांच्या मंदीराचा रिक्षा करून दिला. वरील घटनेवरून जसे काही त्यांनी मला दाखवून दिले की

> "अरे तू व्यर्थ काळजी करू नकोस
> तुझा पूर्ण भार घेण्याला मी समर्थ आहे.
> तू फक्त निस्वार्थतेने कर्म करीत राहा"

श्री. मेनन नावाचे माझे एक मित्र मिलिटरींत अधिकारीपदावर नोकरीस आहेत. ते पाक युद्धानंतर सीमेवरून परतल्यावर त्यांचे प्राण वाचविण्यास श्री साईबाबा कसे आडवे आले हे त्यांनी मला व माझे मित्रबंधु प्राध्यापक गोकुलप्रसाद साहूंना कळविले. त्यांनी सांगितलेली गोष्ट अशी आहे :—

> "माझी काही मित्रमंडळी मी सीमेवर कार्यरत असताना विश्रांती-काळात पिकनिककरीता एका नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या स्थळी निघताना, त्यांनी मला सोबत चलण्याचा आग्रह केला. मला श्री साईबाबांची पूजा करावयाची असल्याकारणाने मी त्यांचेबरोबर जाऊ शकलो नाही. ते निघण्याच्या अर्ध्या तासानंतरच कळले की एका बर्फाळ पर्वताचा एक फार मोठा भाग कोसळल्याने ती जीप दुसऱ्या बाजूकडील खाईत पडून दुर्घटनाग्रस्त झाली व त्यातील बरोबरची माझी सर्व मित्रमंडळी ठार झाली. श्रीसाईबाबांना मला

वाचवावयाचे होते म्हणूनच त्यांनी पूजेच्या निमित्ताने मला थांबविले. नाहीतर माझीसुद्धा इहलीला संपलेलीच होती"

ही गोष्ट आम्हांस सांगताना त्यांच्या डोळ्यांत अश्रू आले. श्री. मेनन ड्युटीवर असताना देखिल आपल्या जवळ श्रीसाईबाबांचे लहानसे फोटो सतत बाळगतात, व वेळात वेळ काढून त्यांची पूजा नियमितपणे करीत असतात.

नंतर आम्ही तिथे श्रीसंत गुलाबबाबांच्या दर्शनार्थ त्यांच्या निवासस्थानी गेलो असताना श्रीबाबा मेननला पाहताच उद्गारले :

"अरे हा वाचला, फार मोठा दगड आला होता की."

यावरून निदान हे तरी स्पष्ट होते की, ते एका ठिकाणी असतांना देखिल दूरवर स्थित आपल्या भक्तांविषयी त्यांना पूर्ण जाणीव असते.

एकदा असेच प्राध्यापक साहूबरोबर श्री संत गुलाबबाबांच्या दर्शनाला गेलो असतांना आम्हां दोघानाही ते श्री गोपाल कृष्णाच्या मूर्तीची पूजा आतील बाजूस असणाऱ्या देवघरात करताना दिसले. थोड्याच वेळाने श्रीबाबा बाहेरून आलेल्या मोटारीने खाली उतरताना पाहिले. पुन्हा देवघरात डोकावले असताना तेथे आम्हांला कोणीच दिसले नाही. भक्तांना विचारपूस केल्यावर आम्हांस असे कळले की, श्रीबाबा चार तासानंतर आताच आलेले आहेत.

यावरून श्रीसंत गुलाबबाबा एकाच वेळेस दोन वेगवेगळी शरीरे धारण करू शकतात हे स्पष्ट होते व त्यांच्या या योगिक क्रियेवर आमचा तरी विश्वास जडलेला आहे.

मागेच अनेक वर्तमान-पत्रात ठळक अक्षरात ही गोष्ट उद्घोषित करण्यात आलेलीच आहे की मोटारीतले पेट्रोल संपल्यावरही बिना पेट्रोलने श्रीबाबांनी मोटार किती तरी वेळपर्यंत चालवून दाखविली, व या घटनेला स्वतः दृष्टीने बघितलेले अनेक साक्षीदार माझ्या ओळखीचे आहेत.

प्राध्यापक साहूंना चार मुलीनंतर जन्मलेले मुलं सुद्धा श्रीसंत गुलाबबाबांचा कृपा प्रसाद आहे असे ते स्वतः नेहमी सांगत असतात. या मुलाचे नाव त्यांनी श्री बाबांच्या आज्ञेप्रमाणे 'गजानन' ठेवलेले आहे.

गजाननाच्या जन्माची गोष्टसुद्धा फार मजेदार आहे. रात्री वेळ आल्यावर त्यांनी आपल्या सौभाग्यवतीस, जिला मी 'ताई' संबोधितो, सुतिकागृहात भरती करून प्रा. साहू घरी येऊन झोपले. बाळंतपणास अजून अवकाश होता. मध्यरात्रीच्या सुमारास श्री साईबाबांनी स्वतः येऊन त्यांना जागे केले व म्हणाले :—

"अरे क्या घोडे बेचकर सोया है।
जा जल्दीसे पेढे ला। तुझे लडका हुवा है
इस खुशिमें तो मुझे पेढे खिला!"

व लगेच ते अंतर्धान पावले.

त्यावेळेस सुतिकागृहात मुलप्राप्तीचा सुसमाचार मिळालेली ताई सारखी श्री बाबांची करुणा भाकीत होती की तिच्या यजमानांना ही आनंदाची गोष्ट या मध्यरात्री कोण कळविणार ?

निद्रावस्थेत असल्याकारणाने ते श्री साईबाबांची चरणवंदना देखिल करू शकले नाहींत याचे प्रा. साहू यांना अद्यापही वाईट वाटत असते. इकडे सौ. ताई श्री साईबाबांद्वारे इतक्या क्षुल्लक प्रतीचे व हलक्या दर्जाचे काम करवून घेतले म्हणून आपल्या मनावरच रोष काढीत असतात. दृष्टीसमोर बागडत असलेला गजानन त्यांना सतत श्रीसाईबाबांची व श्री गुलाबबाबांची आठवण करत असतो.

येथील रघुजीनगर स्थित लक्ष्मीनारायण मंदीरात प्रा. साहूंच्या अध्यक्षते-खाली श्री साई-पूजेचा एक उत्सव साजरा करण्यात आला असताना श्रीसंत गुलाबबावा आपल्या वाजंत्री मंडळी सोबत अचानकपणे तिथे आले व मंदीरा-तील मूर्तीस नमन करून श्री. कापसे गुरुजींच्या घरी निघाले असताना मंदिराचा सर्व भक्त समुदाय त्यांच्या सोबत गेला. मी सुद्धा गेलो असताना श्री बाबा माझ्या लखव्याने रोगग्रस्त असलेल्या उजव्या खांद्यास टेकून कमीत कमी ५–१० मिनिटे तरी आपला संपूर्ण भार टाकून उभे होते व तेव्हापासूनच खांद्याचे निष्क्रीय पडलेल्या अवयवांनी पूर्ववत काम करण्यास सुरवात केली असे मला तरी वाटते.

**विविध चमत्कार :**

श्री संत गुलाबबावांच्या अनेक चमत्कारांविषयी थोडक्यात सांगावयाचे झाल्यास :– तबला वाजवून पाऊस आणणे, ढगांना विनंती करताच पाऊस थांबविणे, हातात काहीही नसताना गरजूंना पैसे देणे, प्रसाद देणे, शिजवलेले मोजके अन्न पंक्ती उरकल्यानंतरही उरणे, सर्पाची विषबाधा होऊ न देणे, भर वेगाने चाललेल्या मोटारीतून उतरणे, भक्तांना ऐन अपघातात दर्शन देवून वाचविणे, गेलेल्या विजेला हुकमाने प्रकाशमान करणे, दुःख दूर करणे, सहन-शक्ती निर्माण करणे, एकाचवेळी दोन दोन कार्यक्रमास हजर राहणे, मुक्याला वाचा देणे, रोगमुक्त करणे, असे कितीतरी अनुभव स्वतः अनुभविलेल्या व्यक्ती या संपूर्ण देशभर सापडतील. मी स्वतः त्यांच्या यौगिक क्रियेविषयी मागे

उल्लेख केलेलाच आहे. ते भक्तांना संकटकाळी स्वत:जवळ बसवून ठेवतात, किंवा बरोबर घेऊन हिंडत असतात. अर्थातच भक्तांना याची पूर्णपणे जाणीव असल्याकारणाने परवानगी शिवाय व प्रसाद घेतल्याशिवाय कुणी उठत नाही. नागपुरातील नाईक रोडवरील श्री. राजहंसाच्या घरी जो दरबार भरतो तो पाहण्यासारखा असतो. त्यांच्या मातोश्रीतुल्य श्री आईसाहेब राजहंस स्वत: आपल्या देखरेखित भक्तांची काळजी घेऊन योग्य तो बंदोबस्त करीत असतात. जो जो भक्त श्री गुलाबबाबांकडे आपल्या अडचणी, रोग-निवारणार्थ वा दु:खभार हलका करण्याकरिता भक्तीभावाने जातो त्याला प्रचिती येते. एवढेच नव्हे तर जे नास्तिक अथवा गुंड त्यांची नालस्ती करतात वा परीक्षा घेण्याचा जवळून वा दुरून प्रयत्न करतात; त्यांना असे चमत्कारपूर्ण झटके बसतात की तेसुद्धा त्यांचे निस्सीम भक्त बनतात. अंगात सदरा, लांडे धोतर, डोक्याला वा पायात काही नाही अशी श्री गुलाबबाबांची प्रसन्न हसरी मूर्ती पाहिल्यावर आणि विशेषत: त्यांनी आपल्या भजनाने आणि अलौकिक सामर्थ्याने लक्षावधी लोकांना भक्तिमार्गाला लावून उदयोन्मुख केले हे ज्यांनी पाहिले आहे, त्यांना श्री गुलाबबाबांच्या आध्यात्मिक अवतार कार्याविषयी संशय राहणार नाही. आपले भूतपूर्व मुख्यमंत्री श्री. स्व. कन्नमवार नागपूर दौऱ्यावर आले असताना प्रथम त्यांचे दर्शनाकरिता त्यांच्या निवासस्थानी जात असत. श्री गुलाबबाबांनीच त्यांची या पदावर पदारूढ होण्याबाबत भविष्यवाणी केली होती. अलीकडेच आपल्या वर्तमान प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधीला त्यांनी आशीर्वादास्तव श्रीफळ दिलेले आहे. श्रीसंत गुलाबबाबांच्या एका कार्यक्रमास काही पुढारी नेते मंडळी उपस्थित होती. श्रीबाबांनी त्यांना माईकवर दोन शब्द बोलण्याचा मौका दिला असता त्या पुढाऱ्यांनी तब्बल दोन तास भक्तसमुदायास 'बोअर' केले. कोणीतरी एका भक्ताने याबाबत श्री बाबांच्या कानात सांगितले असता श्रीबाबा सहजपणे हासतच म्हणाले, "धुतलेल्या कपड्यांना कोण साबण लावतं? मळके कपडे धुवायचे असतात."

श्रीसंत गुलाबबाबांना श्रीमंतापेक्षा गरीबांचाच जास्त जिव्हाळा वाटतो. कारण असे की त्यांना माहीत आहे की :—

"गरीबी अव्वल बादशाही
अमीरीसे लाख सवाई."

माणूस श्रीमंत झाल्यावर त्याला ईश्वराचा पूर्ण विसर पडतो. परंतु गरीबीत जीवन कंठणारा माणूस आपणावर आलेल्या अनेक संकटांना तोंड देताना — क्षणोक्षणी सतत ईश्वराची आठवण करीत असतो. अर्थात ईश्वराची

आठवण करण्याचे भाग्य त्याला लाभते. म्हणूनच श्रीसाईबाबांनी वरील शब्दांचे अनेक वेळा उच्चारण केलेले आहे. वाजंत्री लोकांची परिस्थिती नेहमी नाजुकच असते. म्हणूनच श्रीसंत गुलाबबाबा अनेक वेळा त्यांच्या सोबत वाद्य वाजविताना दिसतात. श्री गुलाबबाबा अनेक कलेत पारंगत असून कोळशाने जमिनीवरच श्रीराम, श्रीकृष्ण वगैरे देवादिकांची चित्रे ते इतक्या हस्तकौशल्याने चितारतात की पाहणाऱ्याची मतीच गुंग होते. तसेच गायन करीत असताना श्री बाबा गाण्याचा स्वर इतका उंच चढवितात की पारंगत व प्रविण हार्मोनियम वादक साथ देण्यास झेपतो. उलटपक्षी श्री बाबांनी हार्मोनियम हातात घेतल्यावर कोणताही नामांकित गायक त्यांची साथ चिकाटीने देऊच शकत नाही. अनेक रेडिओस्टार श्रीसंत गुलाबबाबांपुढे हजेरी देऊन आपल्याला धन्य समजतात. सध्या उपलब्ध असलेली सर्व वाद्ये श्रीबाबा निपुणतेने व कौशल्याने वाजवू शकतात. असे कोणतेही वाद्य नसेल ज्यात ते प्रविण नाहीत. कोणताही अपरिचित इसम त्यांचेजवळ गेल्यास मोठ्या प्रेमाने व वात्सल्याने श्रीबाबा त्याचेशी त्याच्या विषयी विचारपुस करीत असतात. शेकडो भक्त त्यांच्या भोवताली जमलेले आढळतात.

**जन्मतिथी उत्सव :** त्यांचा जन्मदिवस नागपुर येथील रेशमबाग स्थित त्यांच्या आश्रमात दरवर्षी १ जुलैला मोठ्या थाटाने साजरा करण्यात येतो. याप्रसंगी श्रीबाबा स्वतः येथे असतात – हेच नागपुरातील नागरिकांचे भाग्य म्हणावे लागेल. हा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने पार पाडण्यात येतो. सकाळ पासूनच त्यांच्या निवासस्थानी भक्तांची गर्दी दर्शनार्थ जमण्यास सुरवात होते. अंदाजे ८–९ वाजेपर्यंत श्रीबाबा पाळण्यावर बसून येणाऱ्या भक्तांना आशीर्वाद व प्रसाद देत राहतात. पाळणा फुल हारांनी व विजेच्या छोट्या बल्बच्या तोरणांनी सजविलेला असतो. अनेक ठिकाणचे वाजंत्री येऊन आपआपली वाद्ये वाजवित असतात. भजन करणारी मंडळी भजनात गुंग असतात. गायक कलाकार गायनाची हजेरी देतो. भक्तांचे येणे जाणे अविरोध चालू असते. श्रीबाबांना नंतर आंघोळ घालण्यात येते. दूर दूरून खेडेगावातील अनेक मंडळींचा आदल्या रात्रीपासून त्यांच्या येथे उतरणे चालू होते. आचारी आपल्या स्वयंपाकात व येणाऱ्या भक्तांच्या सेवेत कार्यरत असतात. पुष्कळ भक्तमंडळी आपल्या हाताने श्रीबाबांवर आंघोळ करताना पाणी टाकण्यास स्नानगृहात जातात; व त्या योगाने त्यांचे चरण तीर्थही प्राशन करतात. श्रीबाबा सुद्धा या भक्तांना पाण्याने ओलेचिंब करून सोडतात. नंतर श्री बाबांना नवीन वस्त्रे नेसविली जातात व बाबा लगेच वेटोळातील वडील मंडळींचे आशिर्वाद प्राप्त करून आश्रमाकडे भक्तांच्या मोटारीबरोबर रवाना होतात. तिथे विठ्ठल-रखुमाईच्या

मूर्तीस नमन केल्यानंतर श्रीबाबांना पुन्हा आंघोळ घालण्यात येते. श्रीबाबा स्टेजवर असताना ते इतके हार भक्त समुदायाकडे फेकतात की ते झेलण्याकरिता होडच लागलेली असते. पुष्कळ गुलाल उसळला जातो. या कार्यक्रमाला मोठमोठे नेते, सरकारी अधिकारी गण व पोलीस खात्यातील श्रद्धा बाळगणारे अनेक अधिकारीही उपस्थित असतात. अंदाजे एकहप्ता अगोदरच शहरातील वर्तमानपत्रात समारंभाबद्दल छापले जाते.

परंतु नेहमीप्रमाणे ऐन आरतीच्यावेळेस श्रीसंत गुलाबबाबा कोठेतरी दूर निघून जातात ते स्वतःच्या आरतीला कधीच हजर राहत नाहीत. त्यांना असला षोडषोपचार मुळीच आवडत नाहीं. त्यांना हवे आहे फक्त तुमचे प्रेम–निर्मळ प्रेम – निस्वार्थ प्रेम.

अनेकदा श्रीबाबा आपल्या भाषणात उच्चारीत असतात :–

"मी तुमचा मुलगा आहे. मला हेंच आपणाजवळ विचारावयाचे आहे कीं

देव तुमच्या पैशाचा भुकेला आहे काय ? – नाही.
देव तुमच्या रूपाचा भुकेला आहे काय ? – नाही.
देव तुमच्या मोटारीचा भुकेला आहे काय ? – नाही.
देव फक्त तुमच्या भावाचा भुकेला आहे.
त्याला फक्त काय हवे – तुमचे प्रेम व विश्वास.
हेंच प्रेम तुम्हीं सर्वांना द्या.
जे काही तुमचे पाशी देवाने दिलेले आहे,
ते गोर गरीबांना वाटून द्या.
हेंच परमार्थ प्राप्तीचें खरें साधन
हीच खरी ईश्वर भक्ती."

शेवटी म्हणावयाचे हेंच की, "साई गुलाब गोकुल कन्हैया ! भवसागर पार तारो नैय्या ॥"

## श्री. बी. आर. काकडे श्रीसाईचरणी विलीन

दहिसर येथील निष्ठावंत व जुने साईभक्त तेथील श्रीसाईस्पिरीच्युअल सेंटरचे संस्थापक आणि श्रीसाईलीलेचे एक प्रामाणिक लेखक श्री. बी. आर. काकडेमहाराज हे रविवार दि. २२ फेब्रुवारी १९७६ रोजी सायंकाळी साडे चार वाजता श्री सद्गुरु साईनाथ चरणी विलीन झाले. श्रीसाईनाथ त्यांच्या आत्म्यास सद्गति देवो.

# गुरुमहिमा

● श्री. विनायक पाठक

सामान्यतः एखादी विद्या किंवा कला आपणास शिकविणाऱ्याला आपण गुरु म्हणतो. हिंदी वा उर्दूत गुरुला उस्ताद असे म्हणतात. गुरुनामक एक ग्रह आहे तसाच गुरुच्या नावाचा एक वारही आहे गुरुवार !

पण वरील सर्व व्याख्या मर्यादित स्वरूपाच्या आहेत. गुरू शब्दाची फोड त्या दोन अक्षरातच संपूर्ण आहे. गु म्हणजे गुप्त रूपाचे – म्हणजेच परमेश्वराचे व रु म्हणजे रूप-रहस्य सांगणारा. म्हणजेच परमेश्वराप्रत पोहोचवणारा तो गुरू.

संतश्रेष्ठ तुकारामांनी सुद्धा "माझिया मनीचा । जाणोनिया भाव । तो करी उपाव । गुरुराजा ॥" म्हणून आळवणी केली आहे.

संत कबीर जेव्हा भजने गाऊन लोकांना उपदेश करू लागले तेव्हा त्यांची "निगुरा" (म्हणजे गुरु नसलेला) म्हणून चेष्टा होऊ लागली. ज्याने गुरुचा उपदेश ग्रहण केला नाही त्याला दुसऱ्याला उपदेश करण्याचा हक्कच नाही हा त्या चेष्टेतील मतितार्थ. मग कबीरांनी पंचगंगेच्या घाटाच्या एका पायरीवर रामानंदांच्या आगमनापूर्वीच झोपून त्यांच्या पदस्पर्शाने व त्यांनी उद्‌गारलेल्या "राम ! राम ।" या उपेक्षित क्रोधाने राम रामच गुरूमंत्र म्हणून घेतला व रामानंदांना त्यांनी गुरु केले.

"ना गुरु मिल्या न सिख भया" ही कबीरांची गुरुबद्दल धारणा होती. गुरु महात्म्याने ते इतके भारावले होते की गुरु आणि प्रत्यक्ष परमेश्वर समोर उभे राहिले तेव्हा कबीरांना प्रश्न पडला, "गुरु गोविंद दोनो खडे काके लॉगू पाय ?" कारण "बलिहारी गुरु आपने जिन गोविंद दियो बताय" हा त्यांचा प्रत्यय होता.

"ध्यान मूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पदम् । मंत्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोःकृपा ॥ या पंक्तीत मोक्षाचं मूळ असणाऱ्या गुरुचाच महिमा वर्णन केला आहे. गुरु म्हणजे सगुण, साकार परब्रम्ह परमात्माच आहे.

श्रीरामचंद्रांनी वसिष्ठांना गुरु केलं, श्रीकृष्णानं सांदीपनी ऋषींना गुरु केलं, मच्छिंद्रनाथांनी गुरु दत्ताला गुरु केलं ! मच्छिंद्रनाथाला श्री गुरुदेव दत्ताने

सर्व विद्यांचा मंत्रोपदेश दिला तेव्हा त्याचे सर्व अज्ञान अंतर्धान झाले व सर्व चराचर त्याला ब्रम्हमय दिसू लागले.

श्री सद्‌गुरुची पूजाअर्चा भक्तीभावाने केली तर भूत पिशाच्च निकट राहत नाहीं. गुरुला शरण गेल्याशिवाय सत्यज्ञानाचा मार्ग सापडत नाहीं, अहंकार नष्ट होत नाहीं। परमेश्वरालासुद्धा मनुष्य जन्म घेतल्यावर सद्‌गुरुवाचून तरुणोपाय नाहीं. श्री नरहरी यांनी कृष्ण सरस्वतीचा अधिकार जाणून त्यांना गुरु केले. त्यांचेकडून दीक्षा घेतली व त्यानंतरच ते श्री. नृसिंहसरस्वती बनले.

गुरु म्हणजे सर्व देव – सर्वेश्वर! गुरुची सेवा करा व उपदेशरूपि अमृताचा खावा मेवा. या संदर्भात खालील ओळी फार अर्थपूर्ण आहेत. :–

"श्री गुरुसेवा करा हो करा। मारीतसे मी डांगोरा। सांगताती संचराचरा। गुरु तोचि त्रैमूर्ति!"

गुरुचरित्रातील पहिल्या अध्यायात हाच उपदेश आहे की गुरुला विसरशील तर नरकवास भोगशील! गुरुची सेवा कर. गुरुची सेवा केलीस तर तुला अपूर्व सिद्धी प्राप्त होतील. एवढेच नव्हे, तर प्रत्यक्ष ब्रम्हदेवाने म्हटले आहे की श्री गुरु एखाद्यावर रागावले तर ब्रम्हा, विष्णु, महेश किंवा कुठलाही देव त्याला वाचवू शकणार नाहीं.

ज्याचेवर गुरुची कृपा होते त्याला दैन्य, दारिद्र कधीच बाधत नाही. त्याचे जन्म जन्मांतरीचे दोष जातात. मातीचं सोनं करण्याची किमया गुरुकृपेत आहे. "संतोष होता श्रीगुरुसी। अष्टसिद्धी त्याच्या दासी। क्षण न लागता परियेसी। वेदशास्त्रे त्यासी साध्य!" असे म्हटले आहे ते उगीच नाहीं!

"यस्य देवे पराभक्तिर्यथा तथा गुरौ:" किंवा "गंगा पापं राशी तापं दैन्य कल्पतरू तथा। पापं तापंच दैन्यंच गुरूर्हरति दर्शनात।" यातसुद्धा गुरुकृपेच्या ज्योतीनं चितारुपि अहंकाराचा नाश होतो व गुरुकृपेने भाग्य उदयाला येते – उर्जितावस्था येते हेच सांगितले आहे.

त्रिविक्रम भारतीने आपल्या गुरुला हेच म्हणून आळविले, "तुझी कृपा होय ज्यासी। दुःख दैन्य कैचे त्यासी! तोचि जिंकील काळाशी। परमार्थी ऐक्य होय!" तात्पर्य ज्याचेवर गुरुकृपा होते तो अष्टैश्वर्य भोगतो. गुरु या दोन शब्दातच अमृताचा सागर आहे.

संदीपकाने निष्ठेने आपल्या गुरुची सेवा केली, वेद धर्म ऋषींची सेवा केली. जो गुरुची मनोभावे सेवा करतो त्याचे अंकीत सारे देव होतात. "गुरुबिन कौन बतावे बात?" हे जाणूनच गुरुपौर्णिमेला गुरुची सेवा करून यथोचित गुरु दक्षिणा देण्याचा संकेत आहे. पण हा संकेत पाळताना "बाई म्या गुरु केला। व त्याने मला (अक्षरशः) 'गंडा' दिला असा गुरु मात्र न शोधण्याचे पथ्य पाळणे आवश्यक असते.

गुरुचा पराभव शिष्याकडून झाला तर गुरुला सार्थक वाटते अशा अर्थाचे संस्कृतमध्ये एक सुभाषित आहे.

गुरुशिवाय धनुर्विद्या येणार नाहीं या निष्ठेतूनच एकलव्याने गुरुची मातीची प्रतिमा करून त्यांचे साक्षीने धनुर्विद्येत प्राविण्य मिळविले. नारद हेच वाल्या कोळ्याचे खरे गुरु होत. त्याच्या कानात उपदेशाचे अमृत टाकले नसते तर वाल्याचा वाल्मीकी कधीच न होता. नारद गुरुने दिलेल्या 'राम' मंत्राने लोखंडाचे सोने झाले.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी तर गुरुला माऊली म्हटले आहे व त्या गुरुमाऊलीची अहर्निश सावली मिळावी म्हणून जिवाची कुरवंडी केली. शिवाजींनी समर्थांना गुरु केले व खडकातील एका बेडकीच्या दृष्टांतावरून शिवाजीचा "मी सर्वांचा पालनकर्ता आहे." हा भ्रम दूर केला. गुरुकृपेने त्यांच्या अहंकाराचा तारा नाश झाला. आणि म्हणूनच आपण नेहमी प्रार्थना करावी :—

"गुरुर्ब्रम्हा, गुरुर्विष्णू, गुरुर्देवो महेश्वरा
गुरुः साक्षात् परब्रम्ह, तस्मै श्री गुरुवे नमः ।।

●

# वाऱ्यावरचे विचार

**ले.— द. शं. टिपणीस**

## १६ दोन कुत्रे

विक्रमशेट मोठे घाऊक व्यापारी, चांगलाच पैसा केला होता त्यांनी. गेल्या २—४ वर्षांत त्यांच्या उदरी शनि आला होता. हे त्यांच्या उदरावरून सहज कळण्यासारखे होते. धंद्याला साजेसा त्यांचा रंग होता. काळ्यातील काळा. घरात अमाप संपत्ती व चित्तात सदैव चिंता. मोर्चे घेराव दंगल चोराचिलटांची भीती. घरादाराचे रक्षण करण्यासाठी त्यांनी एक भला मोठा कुत्रा बाळगला होता. तसे विक्रमशेट चिकूच. पण कुत्र्याच्या बाबतीत मात्र उदार. मुलांबाळांना दूध न मिळाले तरी चालेल पण कुत्र्याला रोज रतीब मिळाला पाहिजे. खरं म्हणजे शेट शाकाहारी. पण कुत्र्यासाठी त्यांनी घरात मांसाहार चालू केला. कुत्रा चांगला माजला. मास आहाराने तिखट झाला. त्याच्याकडे पाहून विक्रमशेटना समाधान वाटे. आता काय शामत आहे मोर्चेवाल्यांची व चोराचिलटांची आवारात शिरण्याची !

एक दिवस काय झालं. एक नवपोषाकातील चिमुरडी शेटाणीकडे आली. तिचा अवतार पाहून कुत्र्याला काय वाटले कोण जाणे. त्याने झेप घेतली व तिच्या पोटरीला चावला. कुत्र्याला शेटाणीकडून एक रट्टा मिळाला. तो तिच्या अंगावर भूंकू लागला. नोकरचाकर धावले. रडारड, आरडा ओरड, औषधोपचार सगळं झालं. शेटने भरपाई दिली. कुत्र्याचा पराक्रम पाहून त्यांना बरं वाटलं. कसा वीर पुरुष आहे ? या म्हणावे आता चोरांनो. भलत्याच गर्वात होते. चोर घरात बाहेरून कां येणार ? घरात कुत्र्याआधीच ते होते. भ्रष्टाचार झाला होता. पाहिजे त्या वस्तू जात व नको त्या वस्तू येत. शेटचं लक्ष धंद्यात, धन कमविण्यात. धनाच्या मदानं ते वाटेल त्याच्यावर खेकसत, भुंकत. घरातच चोर उगवतात, हे काय त्यांना माहीत ? त्यांचे लक्ष बाहेर. घरातले चाकर नोकर बळावले. घरातला कुत्रा त्यांनाही सामील. त्याचे लक्ष फक्त बाहेरच्यांकडे मांसाला चटावलेला तो. एक दिवस त्याने शेटलाच प्रसाद दिला. शेटने कौतुकच केलं. कुत्रा हे आपल्या संरक्षणाचे साधन आहे हे ते विसरले. सर्वजण असेच विसरतात. मन हे रखवालदार आहे. त्याला योग्य सात्विक खाणे मिळाले पाहिजे. म्हणजे तो देहाच्या इंद्रियादी खिडक्यातून घुसणाऱ्या रजपमादी चोरांना वळावू देत नाही, मन व देह ही साधने आहेत. त्यांना कोणता आहार किती द्यावा याला धोरण पाहिजे. मनाला लोभाची व देहाला विषयांची चटक लागता कामा नये. नाहीतर ते शेवटी आपल्या धन्याला (आत्मतेज) झाकाळून टाकतील.

## चिंता करतो ज्ञानाची

श्रीसमर्थ रामदास म्हणत चिंता करतो विश्वाची. समर्थच ते. साक्षात मारुतराया त्यांची योग्यता कुठे आणि आपली ! सूर्य आणि पणती. म्हणावे मी विश्व उजळतो. पण पणतीने म्हटले तर हसं होईल, आपण सर्व-साधारण माणसं, आपण आपल्या पायरी परी वागावे. असंख्य विद्यार्थी बंधू आहेत त्यांना हे सांगतो. मोठ्या माणसांना नाहीं. वाचू. तसं म्हटलं तर वाचा-वेही. कारण आपण सारे विद्यार्थीच आहोत. विश्वातील प्रत्येक प्राणी विद्यार्थी आहे. जो आला तो शिकण्यासाठी. जन्मतो तेव्हा पहिले पाऊल शाळेत पडते, हळूहळू शिकत शिकत विश्व विद्यालयात प्रवेश होतो. शिक्षण संपले की शाळा वा विश्व विद्यालय सोडून जातो. जीवनभर आपण शिकतच असतो. उद्देशच तो. नाही तर इथं काय आहे ? काय सुख आहे, मजा आहे म्हणून ट्रिपला आलो ? जीवन ही शाळा आहे, नियती ही मुख्य अध्यापिका आहे. संत व श्रेष्ठ विभूती हे गुरुजी आहेत. तो प्रभू डायरेक्टर आहे तर अवतार हे इन्स-

पेक्टर्स आहेत. येथे सातही दिवस काम असते. नियती क्षणाक्षणाला आपल्याला शिकवित असते. आपले कल्याण व्हावे, भले व्हावे, सोने व्हावे म्हणून संकटे हालअपेष्टा, अडीअडचणी, सुख-दुःखे वगैरे नाना उपायानी ती शिकवीत असते. खेळ केला तर शिक्षा ठरलेली. शाळेला सुटी म्हणून नाही. म्हणून म्हणतो की आपण सर्व विद्यार्थी आहोत. विद्यार्थ्यांनी विश्वाची चिंता करू नये. प्रथम स्वतःची करावी. समर्थ, ज्ञानेश्वरादी संत व टिळक गांधी आदी विभूती हे गुरुजी पदावर आहेत. आपण विद्यार्थी. आपण शिकावे. गुरुजी शिकवतात ते शिकावे. कळते की नाही, उमजते की नाही ते पहावे. कळेल कसे, उमजेल कसे याची चिंता करावी, ध्यास घ्यावा. शिकताना का कसे हे प्रश्न उद्भवले पाहिजेत. त्यांची उत्तरे कशी व कोठे मिळतील याची चिंता लागली पाहिजे. हे विश्व का झाले, कोणी केले, कसे केले हे जाणण्याची उत्कंठा उच्च विद्यार्थ्यांना लागली पाहिजे. ती पूर्ण करण्यासाठी ठिकठिकाणचे गुरू पाहिले पाहिजेत. त्यांना ऐकले पाहिजे. मिळेल तेथून ज्ञान मिळविण्याच्या प्रयत्नात असले पाहिजे. समर्थांनी म्हणावे चिंता करतो विश्वाची, आपण म्हणावे चिंता करतो ज्ञानाची.

●

## श्रीसाईकृपा

माझे माहेर शिर्डी गांव ग
मला वाटतं माहेरी जावं ॥ धृ ॥
माझ्या माहेरची वाट आहे नीट
साळू जोंधळा आला घनदाट
श्री सद्‌गुरु साई त्यांचे नाव ग मला ॥१॥
माझ्या घरा शेजारी हिरवट रान
काय वर्णू त्या हिरवटाचे गुण
गोदावरीत घालली नांव ग – मला ॥२॥
माझ्या घराशेजारी एक मठ
दरवर्षाला येती साधू-संत
श्री साईचे धरावे पाय ग–
मला वाटलं माहेरी जावं ॥३॥

– मंगला राणे.

# श्री संत गुलाब बाबा - दरबार

दीन दुबळयांच्या सेवेसाठी
'प्रभो' तुझा अवतार
गुलाबा धन्य तुझा दरबार ॥धृ.॥
भक्तासाठी तूं जगजेठी
आंधळयाची होऊनि काठी
करशी नौका पार
गुलाबा धन्य तुझा दरबार ॥धृ.॥
देवकी नंदन जय घोषातून
स्वरास्वरांच्या लयीलयीतुन
आज निघे झंकार
गुलाबा धन्य तुझा दरबार ॥धृ.॥

—दा. ना. देशमुख, नागपूर

# भावसागरके पार लगा दे

हे सद्गुरू साईनाथ, जय साईनाथ, जय जय साईनाथ ॥धृ.॥
अनाथके तुम नाथ, साई ! अनाथके तुम नाथ।
द्वारकानाथ प्रकट हुये शिरडीमें, जय जय पंढरीनाथ।
तुमही मेरे मातापिता, मुझे किया सनाथ।
श्रीनिवृत्तिनाथ, जय एकनाथ, जय जय भोलेनाथ।
ज्ञानदेव, देव तुकाराम, तुमही माधवनाथ।
जय साईनाथ, जय जय साईनाथ —॥१॥
काशिनाथ निकट बुलाकर, रची द्वारकापुरी
साठ वर्ष के पेस्तर जहाँ था एक सुंदर अंकुर
वही बना आज प्रचंड अजानवृक्ष
तन-मन-धनसे शरण जो आते
उनके प्रति तुम कल्पवृक्ष
धन्य साई ! धन्य साई ! धन्य शरणागत !
'जय साई' 'जय साई' रहो साईनाथ
भवसागर पार लगा दे, हे मम दीनानाथ — ॥२॥

—ना. पु. अवस्थी, पुणे

# संत गुलाबाच्या- पहा काटेलाला

संत गुलाबाच्या पहा काटेलाला
एक नाम मुखी गोपाला गोपाला

भरे भक्त मेळा शिवरात्रीयेला
साधू संत येती हरी कीर्तनाला

कचेरीच्या तिरी, कदंबाची शोभा
कर कटेवरी विटेवरी उभा

भक्तांच्या भेटीची वाट पाहे झिरा
कुणि तीर्थ घेती कुणि लावि शिरा

संगमाच्या कांठी होई रास लीला
तिथे गोपगोपी कधी पाही तुला

अश्रुतूनि वाही भक्तिरस धारा
नदी वाही 'वाण' घेऊनिया सारा

पांच उंबराचा मोराचा पिसारा
'गुरुदत्त' पाही कुणी हा नजारा

—दा. ना. देशमुख, नागपूर.

# साई ! तुम हो दयानिधान

साई ! तुम हो दयानिधान
प्रिय भक्तों के हो भगवान ॥टेक॥

अगाध महिमा अगाध कीर्ति
पावन नगरी, पावन शिर्डी
शोभा अनुपम मनको हरली,
तीर्थक्षेत्र वरदान ॥१॥

श्यामल मूर्ति कुंज बिहारी
फकीर वेष में लीला न्यारी
योगी जनों की मति है हारी
तव चैतन्य महान ॥२॥

माया की यह काल कोठरी
मन पंछी की नित्य हाजरी
प्राणों की जो करे चाकरी
साई ! प्राणनिधान ॥३॥

महिमा निसदिन जो भी गावे
जीवन में वह शांति पावे
तव समाधि के दर्शन लेवे
शिरडी सुख की खान ॥४॥

—राधाकृष्ण गुप्ता 'चेतन'

# " दिव्यत्वाची येथे प्रचिती !

"पैसे नाहीत वेळही नाही"
करीत होतो वेडी कुरकुर
शिरडी-क्षेत्री माझे जाणे
ढकलीत होतो आज उद्यांवर
आज्ञा करीतां परि बाबांनी
"श्रीसाईलीला" पडले हातीं.
संमेलनाची कळली वार्ता
योगायोग कसा येई जुळूनी.
हाच 'सूर्य' नी त्याची प्रकाश
फकीराचा साधासुधा वेश
'विश्वव्यापी' या 'दिव्यरूपी'चे
क्षेत्रची 'शिरडी' गांव-देश.
दिव्यत्वाची सदा येथे प्रचिती
श्रद्धेची अन् ये अनुभूति
'बाबां'ची गाथा वर्णाया महती
शब्दहि सगळे अपुरें पडती.

—विजय द. हजारे. एम. ए.

# पद साईबाबांचे

चरण तयांचे धरू मनी या साईनाथ स्मरू ।
दीन दयाघन पतितपावन असती कल्पतरू ।।धृ.।।
शिरडी ग्रामी वास तयाचा भवाब्धी ते तारु ।
चिन्मयमूर्ति सतेज कांती गाय तो मी वासरू ।।१।।
मोहपाशातूनी सोडवी आता चुकला वाटसरू ।
दैवत हृदयीं नित्य असावे नका तया विस्मरू ।।२।।
शरण त्यापदी भक्तसखा हा तारक हे सद्गुरू ।
कृपा छत्र मम शिरी असावें अनाथ मी लेंकरू ।।३।।

कवि – स. मा. मुन्हार
नागपूर.

५६

## साई नाम

घेता नाम मुखी साईचे
जीवनाचे सार्थक होते
जीवन नौका उद्धरते ॥१॥
साई नामी असे गोडवा
खडी साखरेचा खडा ॥२॥
फुलांमध्ये जैसा मधुगंध
साईनामीं तैसा मकरंद ॥३॥
हा मकरंद भक्त तोचि जाणीतो
जो साईचिया भक्ती रंगतो ॥४॥
होता साईनामाचा गजर
शिर्डी डुंबे भक्ती रसात ॥५॥
हा भक्तीरस पान करून
जिवा शिवाचे होते मिलन
जीव ब्रम्हांडासी जाये विरून ॥६॥

—सौ. सरला सु. गर्जे, पुणे.

## अंतरीची आस

शिर्डी नगरात साईचे मंदिरी
आस जावयाची लागली अंतरी ॥धृ.॥
दीप तेलाविणा लाविले साईनीं
लीला दाखविल्या असंख्य रूपांनी
जाऊनी दर्शन घेऊ दरबारी
आस जावयाची लागली अंतरी ॥१॥
माझे साईनाथ जगी धन्य झाले
दीन दुबळ्यांना त्यांनीच तारिले
म्हणुनी भजती जगी नरनारी
आस जावयाची लागली अंतरी ॥२॥
जीवनात मला जो तो स्वार्थी भेटे
मार्गी ठायीठायी अगणित काटे
साईनामे झालों सुखी या संसारी
आस जावयाची लागली अंतरी ॥३॥

—रमेश डी. चव्हाण.

# मजवरी ठेवा कृपाकटाक्ष

साईबाबा, तुमची लिलाच अगाध ।
रक्षिता भक्तांना तुम्ही दिनरात ।।धृ.।।

नितांत 'श्रद्धा' ठेवुनिया भजति
मनांत अपुल्या 'सबुरी' धरिती
तयांना मिळतसे आपोआप मोक्ष ।।१।।

संकटात तुमचे स्मरण करिता
कसे ना कळे त्यांतुनी सोडविता
हातांत नसता कसलेही आयुध ।।२।।

धन, मान, शांती मिळे जीवनांत
सुखाची पाऊले फिरती घरात
अनुभवाचे बोलतो तुमचीच साक्ष ।।३।।

भक्तिने वंदितो तुमचे चरण
प्रेमभरे गातो गुणांचे भजन
मजवरी ठेवा प्रभू सदा कृपाकटाक्ष ।।४।।

—दत्ताराम आ. बारस्कर.

# * घोषणा *

श्रीसाईलीला मासिकाच्या मालकीबद्दल व अन्य तपशीलाबद्दल दर वर्षी फेब्रुवारी नंतरच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध करावयाची घोषणा.

| | |
|---|---|
| १. प्रकाशनाचे स्थळ | साई निकेतन<br>८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर,<br>मुंबई ४०० ०१४ |
| २. प्रकाशनाचा कालावधी – | मासिक |
| ३. मुद्रकाचे नाव – | श्री. पांडुरंग दाजिबा मोरे |
| राष्ट्रीयत्व – | भारतीय |
| पत्ता – | बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स, वडाळा, मुंबई ३१<br>मुंबई ४०००३१ |
| ४. प्रकाशकाचे नाव – | श्री. काशिनाथ सीताराम पाठक |
| राष्ट्रीयत्व – | भारतीय |
| पत्ता – | साई निकेतन<br>८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर.<br>मुंबई ४०००१४ |
| ५. संपादकाचे नाव – | श्री. काशिनाथ सीताराम पाठक |
| राष्ट्रीयत्व – | भारतीय |
| पत्ता – | साई निकेतन,<br>८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर,<br>मुंबई ४०० ०१४ |
| ६. हे पत्र ज्यांच्या मालकीचे आहे त्यांचे व १ टक्क्याहून अधिक भांडवल धारण करणारे भागधारक किंवा भागीदार यांची नावे व पत्ते. | श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी<br>(धार्मिक व चॅरिटेबल संस्था) |

मी, श्री. काशिनाथ सीताराम पाठक यानुसार असे घोषित करतो की वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

**का. सी. पाठक**
(प्रकाशकाची सही)
रिसीव्हर
श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

मार्च १९७६.

# साधु संत येती घरा । तोचि दिवाळी दसरा ।



पण केवळ साधु संतच नव्हे तर प्रत्यक्ष "रामावतारी" "कृष्णावतारी" "दत्तावतारी" भगवान् सच्चिदानंद सद्गुरू **श्रीसाईबाबा** (शिरडीचे) आपल्या घरी येतील तो तुमच्या आयुष्यातील **'सोनियाचा दिस'** होय.

आजच श्रीसाईबाबांची शिलाखंडावरील पूर्णाकृती पंचधातूची (ब्रॉंझ) अभंग मूर्ति खरेदी करून आपल्या घरी बाबांना कायमच्या वास्तव्याला बोलवा. मग काय रोज पूजा आरती नैवेद्य म्हणजे जणू काय **"झाहले घराचे मंगल देऊळ !"**

अशा तऱ्हेने साईभक्ताचे प्रत्येक घर हे एक लहान का होईना पण प्रत्यक्ष बाबांचे मंगल देऊळ बनावे अशी इच्छा मनी धरून आम्ही श्रीसाईबाबांची ९ इंच उंच व ५ इंच रुंद अशी पंचधातूची अत्यंत मजबूत अशी मूर्ति बनविली आहे. जिला अगदी लहान मुलांपासूनसुद्धा फारसे जपावे लागत नाही.

मूर्तीचे खास वैशिष्ट्य म्हणजे ती पंचधातूची व योग्य साईजची बनविल्यामुळे एक तर मूर्ति ताम्हनांत ठेवून तिला सुवासिक अत्तराने अगर पंचामृताने स्नान, अभिषेक घालता येतो. तसेच मूर्तीला डोक्यावर शिरपेंच, मुकुट इत्यादि अलंकार व फेटा अगर इतर रंगीबेरंगी पोषाखाने मूर्ति अत्यंत शोभिवंत करून आपल्याला कमालीचे मानसिक समाधान मिळते.

मूर्तीची किंमत अत्यंत वाजवी ठेवली आहे !

तसेच श्रद्धावंत भक्तांच्या काही अडचणीही आम्ही लक्षात घेऊन योग्य प्रकारे सहाय्य करू ! बाहेरगावी मूर्ति पोस्टाने अगर व्ही. पी. ने पाठवू.

"मूर्तीच्या स्थापनेसाठी सुबक डिझाईनचे लाकडी देव्हारे उपलब्ध आहेत."

अधिक माहिती वा इतर तपशिलासाठी प्रत्यक्ष भेटा अगर लिहा :—

**श्री. मनोहर घनःशाम पितळे,**
पितळेवाडी, हनुमान रोड.
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०,००५७
फोन नंबर : ५७ ६२ ९८.
भेटण्याची वेळ : सकाळी ७ ते ९
रात्री ७ ते ९.

Regd. No. MH/BYE/26

# तीन रंगी आशीर्वाद फोटो



| आकार | किंमत | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १४" × २०" | रु. १—५० | ८" × १०" | रु. ०—५० |
| १०" × १४" | रु. १—०० | २½" × ३½" | रु. ०—२० |
| ४½" × ५½" | रु. ०—३० | | |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. डी. डी. नेरॉय यांच्या ब्लॉकावरून छापलेले फोटो

| प्रकार | रंग | आकार (सें. मी.) | किंमत |
|---|---|---|---|
| १. शिळेवर बसलेले बाबा | तीन रंगी | ३५.५६ × ५०.८ | १—५० |
| २. शिळेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | ,, ,, | १—२५ |
| ३. शिळेवर बसलेले बाबा | ,, | २२.८६ × ३३.०२ | ०—५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | ,, ,, | ०—५० |
| ५. शिरडी दर्शन (६६ फोटोंचा अल्बम) | | | २—०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१ शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुं. नं. १४

मुद्रक : **पांडुरंग मोरे**, बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.

४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई ३१.

संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक**, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई–१४.

# श्रीसाईलीला



एप्रिल १९७६ ] खास रामनवमी विशेषांक [ मूल्य ६० पैसे

# अनुक्रमणिका – एप्रिल १९७६


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय – | सदासर्वदा राम चिंतीत जावा |
| २) | गाठी भेटी – साईभक्त डॉ. के. भ. गव्हाणकर | श्री. चंद्रकांत सामंत |
| ३) | श्रीसाईबाबांच्या जन्मस्थानाचा शोध | डॉ. श्री. दि. परचुरे |
| ४) | जीवदान देणारे श्रीसाईनाथ महाराज | श्री. सूर्यकांत गर्जे |
| ५) | मृत्यु आणि बाबा | कै. बी. आर. काकडे |
| ६) | जया मनी जैसा भाव, तैया तैसा अनुभव | श्री. विजयसिंग परदेशी |
| ७) | श्रीसाई महिमा | डॉ. अनिल जायस्वाल |
| ८) | साईभक्त किर्तनकार कै. बापूराव काकडे | श्री. सदानंद चेंदवणकर |
| ९) | वाऱ्यावरचे विचार | श्री. द. शं. टिपणीस |
| १०) | शिर्डीवृत्त | जाने. – फेब्रु. – १९७६ |
| ११) | श्री अक्कलकोट स्वामी महाराज पुण्यतिथी | सौ. सुभाषचन्द्र |
| १२) | काव्यकुसुमांजली | |

श्री. राधाकृष्ण गुप्ता 'चेतन', श्री. दत्ताराम बारस्कर, श्री. श्रीधर सिद्धेश्वर प्रभुणे, ग. दे. कुळकर्णी, श्री. बि. शं. आकेरकर, श्री. रमेश चव्हाण, विमल खडताळे, सौ. सुशिलाबाई हजारे, रामचन्द्र बाक्रे, सौ. शांता मरोदे, कमल पांडुरंग मोरे,


## मुखपृष्ठासंबंधी

(श्रीसाईलीलेच्या मुखपृष्ठावर छापलेले बाबांचे अप्रसिद्ध असे चित्र बाबांचे नागपूरचे निस्सीम भक्त कै. गोपाळराव बुटी यांच्या नातवाकडून छायाचित्रकार श्री. उत्तरवार यांनी मिळविले व ते आम्हांस श्रीसाईभक्त डॉ. के. भ. गव्हाणकर यांनी भेटीदाखल पाठविले. या छायाचित्राचा इतिहास कै. हरी सीताराम उर्फ काकासाहेब दिक्षित यांच्या रोजनिशीत लिहिलेला आहे. तो मजकूर पुढील अंकी प्रसिद्ध करू. – का. सं.)

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्री साई वा क्सु धा

भक्ति ही सोज्वळ सीताफळ ।
ज्ञान हे परिपक्व रामफळ ।
एकाहूनि एक रसाळ ।
मधुर परिमळ तैसाच ॥२७॥

रामफळ गर्भाचा गीर ।
फळ काढूनि पिकवितां उगीर ।
वृक्षींच पिके तों धरी जो धीर ।
तयासीच मधुर लागे तो ॥२८॥

रामफळाची गोडी सरस ।
देठेंसी परिपक्व होई जों तरुस ।
उगीर लागे पडतां भुईस ।
अति मिठास वर पिकतां ॥२९॥

वरचेवर जो पिकदं जाणे ।
तेणेंच त्याचा आस्वाद घेणें ।
सीताफळ हें सायास नेणे ।
अल्पगुणें बहुमोल ॥३०॥

रामफळासी पतन भय ।
ज्ञानियाही नाही निर्भय ।
झाला पाहिजे सिद्धि विजय ।
लव हयगय कामा नये ॥३१॥

—श्री साईसच्चरित अध्याय १९ वा.


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे
अधिकृत मासिक ]

वर्ष ५४ वे] एप्रिल ७६ [अंक १२

: संपादक :
श्री. का. सी. पाठक,
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :
● डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
● श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४–बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४
दूरध्वनी : ४४१३६१

## संपादकीय—

**स. न. वि. वि.**

## सदासर्वदा राम चिंतीत जावा

सणात सण पाडव्याचा । जन्मात जन्म रामाचा ।
या दोन्ही तिथी जवळी आली एक तारीख । श्रीसाईलीलेचा अंक मोठा मोहक ।



यंदा गुढीपाडवा, रामनवमी या दोहोंच्या दरम्यानच एप्रिलची एक तारीख आली. महान योगायोग त्या निमित्य श्रीसाईलीलेचा हा खास रामनवमी विशेषांक आमच्या प्रिय वाचकांच्या हाती देताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. वालिमकी रामायण हा महान ग्रंथ भारतीयानांच नव्हे तर जगातील यच्चयावत् लोकांना सर्वकाळी आदर्शवत् होऊन रहाणारा ग्रंथ आहे. ती आदरणीय व अनुकरणीय अशी जीवनगाथा आहे. या ग्रंथाचा रचनाकाळ हजारो वर्षापूर्वीचा आहे. परंतु यातील जीवनमूल्ये सर्व काळातील स्त्री-पुरुषाना अनुकरणीय होऊन रहाणारी आहेत. पितापुत्र, पतिपत्नी, बहिणभाऊ, भाऊभाऊ, मातापुत्र, सेव्यसेवक गुरुशिष्य राजा आणि प्रजा यांनी एकमेकाशी कशा रीतीने वागावें याचा उच्चतम आदर्श या ग्रंथातील विविध पात्रांच्या रूपाने जगापुढे ठेवण्यात आलेला आहे. प्रत्येकाने आपले जीवन सर्वोत्कृष्ट रीतीने कसे घालवावे व जगात सर्वांकडून भलेपणाचा बहुमान कसा मिळवावा हे रामायण काव्याच्या रूपाने महर्षि वाल्मिकीने सांगितलेले आहे. त्यात प्रत्येकासाठी बहुमोल जीवनमंत्र सांगण्यात आलेला आहे. जगातील कोणत्याही वाङमयात अशा प्रकारची श्रेष्ठ कलाकृती निर्माण झालेली नाही. यात बिलकुल अतिशयोक्ति नाहीं. रामकथा ही अमृताने ओथंबलेली आहे. तिचा एखादा बिंदु जरी प्राशन करता आला तरी तो आपल्या कल्याणास कारणीभूत होणारा आहे.

अशा या रामायणाचा प्रणेता मर्यादारूपी पुरुषोत्तम प्रभू रामचंद्र हा भारतभूमीत हजारो वर्षापूर्वी होऊन गेला. प्रभू श्रीरामचंद्राचा जन्मोत्सव आपण दरवर्षी मोठ्या उत्साहाने व भक्तिभावाने साजरा करतो. तो यासाठी की या पुण्यपुरुषाचे गुणगान आपल्या कडून व्हावे, आपल्या मनावर सुसंस्कार घडावेत, ज्या श्रेष्ठ गुणांच्या बळावर श्रीराम अजरामर झाले त्या सद्गुणांचा सुगंध आम्ही लुटावा व आपले जीवन सुंदर बनवावे यासाठीच.

रामनाम व रामकीर्तन आपल्याकडून अहर्निश घडतच असते. कारण तो मंत्र म्हणजे आपले जीवनच आहे. रामनाम तारक, जीवनपोषक व जीवन मरणाच्या फेऱ्यातून आपला बचाव करणारे आहे. प्रत्येक हिंदु भारतवासीयांची त्यावर असीम श्रद्धा आहे. या श्रद्धेवर आपण गेल्या हजारो वर्षांपासून जगत आलो आहोत व पुढेही याच श्रद्धेवर आपण जगणार आहोत.

असे हे प्रभू श्रीरामचंद्राचे महात्म्य श्रीसाईबाबांनी बरोबर ओळखले. जनता सुखी व्हावी, भारतात व जगात सर्वत्र आबादी आबाद, सुखसमाधान व प्रेमभाव वाढत रहावा हीच तर बाबांची मनिषा. यासाठीच तर त्यांचा अवतार. रामनामाचे तारक व पोषक महत्व बाबांनी अचूक ओळखले, आणि म्हणूनच तर यांच्या हयातीत शिरडीत रामजन्माचा सुखद सोहळा सुरू झाला. आपल्या हयातीत चांगली सात-आठ वर्षे तो त्यांनी पाहिला व हा सर्वांच्या कल्याणास कारणीभूत होणारा सोहळा आपल्या मागे ही अविच्छिन्नपणे चालू रहावा अशी त्यांनी व्यवस्था लावून दिली. लोककल्याणासंबंधीची बाबांची ही भावना आपण समजावून घेतली पाहिजे. रामनामाचे त्यांना एवढे महत्व का वाटले व या उत्सवाला त्यांनी अग्रपूजेचा मान का दिला याचा आपण विचार केला पाहिजे.

आमच्या माहितीप्रमाणे शिरडीच्या पुण्यक्षेत्री श्रीरामजन्मोत्सव सुरू झाल्यास साठ वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. शके १८३३ मध्ये हा महोत्सव शिर्डीस सुरू झाला. त्याला आता पासष्ट वर्षे होत आहेत. बाबांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या या उत्सवास वर्षानुवर्ष उत्साहाचे व व्यापक स्वरूप प्राप्त होऊ लागले आहे ही त्यांचीच कृपा होय. ●

---

● डॉ. श्री. वसंत श्रीधर सस्तुरकर एम. बी. बी. एस. (नागपूर) यांची संस्थानच्या श्रीसाईनाथ इस्पितळात निवासी वैद्यकीय अधिकारी म्हणून नुकतीच नेमणूक करण्यात आली आहे.

---

## श्री. विठ्ठलराव वैती (खोपकर) साईचरणी विलीन

मुंबापुरीतील प्रसिद्ध साईभक्त व मुंबई मुद्रक संघाचे उपचिटणीस श्री. वसंतराव खोपकर यांचे पिताजी श्री. विठ्ठल परशुराम वैती (खोपकर) यांचे ९ जाने. ७६ रोजी त्यांच्या परळ भोईवाडा येथील निवासस्थानी दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८० वर्षांचे होते. ते परम साईभक्त व अध्यात्मवादी होते. उतारवयातही जप-जाप्य पूजा-अर्चा वाचन ते नियमित करीत असत. त्यांच्या मागे त्यांच्या पत्नी, दोन पुत्र, दोन विवाहित व एक अविवाहित कन्या व नातवंडे इ. परिवार आहे.